रविवार, १९ मार्च २०२३

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २३९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


अंतरंग


'अवकाळी'तील नुकसान भरून देऊ! -मुख्यमंत्री/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
कॅप क्लबच्या वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट स्पर्धा/८


### सरकार आणि शेतकरी शिष्टमंडळाची बैठक यशस्वी

# लाँग मार्च अखेर स्थगित



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकार आणि शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाची चर्चा होऊन तोडगा निघाल्यामुळे मुंबईच्या दिशेने येत असलेला किसान लाँग मार्च स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारने आमच्या ७० टक्के मागण्या मान्य केल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत तशी माहितीही दिली आहे. त्यामुळे आम्ही आंदोलन स्थगित करीत असल्याची माहिती शेतकरी नेते जे. पी. गावित यांनी शनिवारी (दि. १८) दिली.

शेतमालाला योग्य भाव मिळावा आणि कष्टकऱ्यांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी किसान सभेचा लाँग मार्च नाशिकच्या दिंडोरी येथून मुंबईच्या दिशेने निघाला होता. पाच दिवसांची पायपीट केल्यानंतर कष्टकरी व शेतकऱ्यांचा हा जनसमूह शहापूरपर्यंत पोहचला होता. पुढच्या काही तासांमध्ये हा लाँग मार्च मुंबईत धडकला असता, परंतु त्यापूर्वीच तो शांत झाला आहे. सरकार आणि शेतकरी शिष्टमंडळाची बैठक यशस्वी ठरल्याने लाँग मार्च स्थगित करण्याचा निर्णय झाला. आता या सर्व शेतकऱ्यांना घरी परतण्यासाठी विशेष ट्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे.

आम्ही एकूण १७ मागण्या केल्या होत्या. यापैकी काही मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. काही मागण्या एक महिन्याने अंमलात येणार आहेत, तर काही मागण्या या केंद्र सरकारशी संबंधित असल्याने त्या केंद्राकडे पाठविण्यात येणार आहेत. या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे शेतकरी नेते गावित यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.


जिल्हाधिकाऱ्यांनी आम्हाला मागण्या मान्य झाल्याच्या सरकारच्या निवदेनाची प्रत दिली. त्यामुळे आम्ही लाँग मार्च स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, असे सांगत गावित यांनी राज्य सरकार, पोलीस, जिल्हाधिकारी यांचे आभारही मानले आहेत.

## महाड चवदार तळे सत्याग्रहाला यंदा प्रथमच दिली जाणार शासकीय मानवंदना

**महाड : प्रतिनिधी**

भाजप-शिवसेना सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून महाड येथे चवदार तळे सत्याग्रह दिनी शासकीय मानवंदना देण्यात येणार आहे तसेच या दिवशी या परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात येईल, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७मध्ये महाडमध्ये सामाजिक क्रांती केली. तेव्हापासून १९ आणि २० मार्च या ऐतिहासिक दिवशी भीम अनुयायी चवदार तळे येथे येऊन महामानवाला अभिवादन करतात.







# अवकाळीतील नुकसान भरून देऊ!

## मुख्यमंत्र्यांचे आश्वासन



**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत आहे, पण शेतकऱ्यांनो चिंता करू नका! या पावसात जेवढे नुकसान होईल ते सर्व आम्ही भरून देऊ, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिले आहे. ते सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथे शनिवारी (दि. १८) आयोजित दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांचा पूर्णाकृती पुतळा आणि स्मारकाच्या लोकार्पण कार्यक्रमात बोलत होते.

या सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, डॉ. भारती पवार, पालकमंत्री दादाजी भुसे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी मंत्री व भाजपच्या सचिव पंकजा मुंडे, खासदार, आमदार आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात ठिकठिकाणी अवकाळी पाऊस होताना दिसत आहे. याचा पिकांना मोठा फटका बसला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे, पण शेतकरी बांधवानो काळजी करू नका. आम्ही सोबत असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. एवढेच नाही तर शेवटी सरकार शेतकऱ्यांचे आहे, कष्टकऱ्यांचे आहे आणि मुंडेसाहेबांच्या विचारांवर चालणारे सरकार आहे, असेही ते म्हणाले.

भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले की, आजही गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणारी जनता आपल्या घरातील शुभकार्याची पत्रिका गोपीनाथ गडावर नेऊन ठेवतात. ही एक श्रद्धा आहे, प्रेम आहे आणि हा एक विश्वास आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी सर्वसामान्य माणसाला न्याय देण्यासाठी संघर्ष केला. आता तर गाड्या घोड्या सर्व आले, पण सत्तरच्या दशकात त्यांनी सायकलवरून शबनमची झोली गळ्यात अडकवून, प्रसंगी पायी प्रवास करून त्यांनी या राज्यात कानाकोपऱ्यात भाजप वाढविण्याचे काम केले. मुंडे आणि प्रमोद महाजन हे खऱ्या अर्थाने या देशाची आणि राज्याची जी गरज होती शिवसेना- भाजप युतीची त्या युतीचे शिल्पकार होते. बाळासाहेबांवरही त्यांचे प्रचंड प्रेम आणि श्रद्धा होती आणि बाळासाहेबांनाही त्यांच्याबद्दल विशेष प्रेम होते, विश्वास होता याचे साक्षीदार आम्ही आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### हॉस्पिटल आणि स्मारकही उभारणार

या कार्यक्रमात बोलताना भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ मुंडेंचे स्मारक उभारण्याऐवजी त्यांच्या नावाने हॉस्पिटल उभारा, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे केली. त्या वेळी पंकजा यांच्या विनंतीला मान देऊन मुख्यमंत्री शिंदेंनी मोठी घोषणा केली आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने हॉस्पिटलही होईल आणि त्यांचे स्मारकही होईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

# अलिबाग चिंचोटीत तरुणीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न




### ग्रामस्थांनी चोपले; तिघांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चिंचोटी गावच्या रस्त्यावर शुक्रवारी (दि. १७) परप्रांतीय तरुणांनी एका तरुणीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न झाला. सुदैवाने वेळीच तिने आरडाओरडा केला आणि गावकरी घटनास्थळी पोहचले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री साडे सात ते आठ सुमारास वावे येथून पीडित तरुणी चालत जात होती. ती ज्या रस्त्याने जात होती, त्या मार्गावर निर्जन ठिकाणी आरोपींनी तीला रस्त्याच्या बाजूला शेतात ओढत नेले. आणि तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तिने विरोध केला म्हणून ओढणीने तिचा गळा दाबण्याचा देखील प्रयत्न केला. सुदैवाने या मार्गावरून एक वाहन गेले, त्याच्या प्रकाशाने घाबरून दोघे पळाले. त्या मुलीने आरडाओरडा केल्याने काही लोकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि त्या आरोपीला पकडले. हा तरुण खाजगी कंपनीत कंत्राटी ठेकेदाराकडे काम करीत असल्याचे सांगण्यात येते. गावातील मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या तरुणाला संतप्त जमावाने चांगलाच चोप दिला. रेवदंडा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३६५, ३५४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन आरोपींना अटक कराण्यात आली आहे.

घटनेची खबर सर्वत्र पसरली आणि गावकरी घटनास्थळी धावले. वातावरण चांगलेच तापले होते. गावकरी ऐकण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हते. या वेळी पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज केला. यात पीडित मुलीच्या वडिलांसह काही लोक जखमी झाले आहेत, अशी महिती गावकऱ्यांनी दिली.

# आमदार प्रसाद लाड यांच्या मागण्यांवर सरकारची सकारात्मक भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. विधान परिषदेत कॅबिनेट मंत्री दीपक केसरकर यांनी अर्थसंकल्प सादर केला होता. पंचामृत ध्येयांवर आधारित असलेल्या अर्थसंकल्पावर विधिमंडळात चर्चा सुरु होती. याच दरम्यान विधान परिषद भाजप प्रतोद आमदार प्रसाद लाड यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेतील भाषणादरम्यान सभागृहात काही मागण्या केल्या होत्या. या मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक उत्तर दिले असून मंत्री दीपक केसरकर यांनी याबाबत सभागृहाला अवगत केले आहे.



आमदार प्रसाद लाड यांनी संगमेश्वर येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक व्हावे, अशी मागणी अधिवेशनाच्या चर्चेदरम्यान केली होती. यावर मंत्री केसरकर म्हणाले की, स्मारकासंदर्भात राज्य सरकार अतिशय सकारात्मक असून स्मारकाचा आराखडा बनवून तो मुख्यमंत्र्यांच्या समक्ष सादर करण्यात येईल व त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणीदेखील आमदार लाड यांनी केली होती तसेच रॉयल्टीच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न कसे वाढवता येईल याबाबत सूचना केली होती. यावर उत्तर देताना मंत्री केसरकर यांनी स्पष्ट केले की, वसंतराव नाईक यांच्या स्मारकाबाबत वैयक्तिक लक्ष घालून उभारणीसाठी पुढाकार घेण्यात येईल. त्याचप्रमाणे रॉयल्टी वाढविण्याबाबत करण्यात आलेल्या सूचनेचा विचार करून आमदार लाड आणि इतर संबंधित आमदारांची बैठक घेऊन राज्याच्या हिताचा निर्णय घेण्यात येईल.

याचप्रमाणे विधान परिषदेचे माजी सभापती स्व. शिवाजीराव देशमुख यांच्या कोकरूड येथील स्मारकासाठी निधीची तरतूद करावी, अशी विनंती आमदार लाड यांनी केली होती. त्यानुसार सरकारने २० कोटींची तरतूद केली आहे. त्यासाठी आमदार लाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

# माथेरानमध्येही आता आयुष्यमान भारत दवाखाना

**कर्जत : प्रतिनिधी**



रुग्णांना प्राथमिक उपचार मिळावेत यासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदमध्ये पर्यटक आणि स्थानिकांची आरोग्य काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषदेने आयुष्यमान भारत दवाखाना सज्ज केला आहे. माथेरान पालिकेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांचा आरोग्य केंद्रासाठी सतत पाठपुरावा होता आणि त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेऊन हा दवाखाना होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

माथेरान गावातील नागरिकांना वैद्यकीय उपचार लवकर उपलब्ध व्हावेत यासाठी जीजी हॉस्पिटल काम करीत आहे. मात्र नागरिकांच्या, पर्यटकांच्या आरोग्य सुविधेसाठी तात्काळ प्राथमिक उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी माथेरान या नागरी वस्ती असलेल्या गिरीस्थान नगरपरिषदेकडून रायगड जिल्हा परिषदेकडे प्रयत्न सुरू होते. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी माथेरानची धावती भेट घेतली होती. तेव्हा शहरी नागरी आरोग्य केंद्र मंजूर केले. त्यासाठी माथेरान पालिका १५ वित्त आयोगाच्या निधीची तरतूद केली आहे. त्याआधी या आरोग्य केंद्रासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदने प्रशासकीय पातळीवर ठराव घेऊन तात्पुरत्या स्वरूपात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या असेम्ब्ली हॉलची जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे आता लवकरच आयुष्मान भारत अंतर्गत आरोग्यवर्धिनी दवाखाना माथेरानमधील जनतेच्या सेवेत रुजू होणार आहे.

> **या आरोग्य केंद्रात स्वतंत्र डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि लॅब असणार आहे. नागरिकांना आरोग्याच्या प्राथमिक सुविधा शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून वेळेत उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी नागरिकांना अत्यल्प कमी खर्च येणार असून, लवकरच हे केंद्र सेवेत रुजू होईल.**
> **-सुरेखा भणगे,**
> **माथेरान पालिका प्रशासक**

# नवीन कुकशेत येथे हरिनामासह पारायण सोहळ्यास सुरुवात



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवीन कुकशेत देवस्थान समिती, कुकशेत यांच्या वतीने नवीन कुकशेत येथे माजी मंत्री गणेश नाईक यांच्या शुभहस्ते कलश पूजन करून अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरुवात करण्यात आली.

प्रारंभी, कलशपूजन लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते देवस्थान समिती अध्यक्ष माजी सरपंच बाळाराम काना पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या सप्ताहात काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, कीर्तन तसेच भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. रविवारी १९ रोजी सकाळी हभप सुनील महाराज राणकर घणसोली यांचे काल्याचे कीर्तन होणार असून सोहळा यशस्वी होण्यासाठी हभप बाळाराम पाटील, मनोहर मोरावकर, गणेश पाटील, सदाशिव पाटील, विजय म्हात्रे, पांडुरंग कडू, अनंत पाटील, गीता पाटील यांच्यासह कुकशेत येथील ग्रामस्थ योगदान देत आहेत.

# बीसीटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची तळोजा मध्यवर्ती कारागृहाला भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तळोजा मध्यवर्ती कारागृहाला भेट दिली.

विधी शाखेच्या, तीन वर्षे आणि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमात क्रिमिनोलॉजी आणि पेनॉलॉजी या विषयाचा समावेश आहे. ज्या अंतर्गत तुरुंग प्रशासनावर एक युनिट आहे. तुरुंग प्रशासनाच्या युनिटची अंतर्दृष्टी आणि योग्य आकलन होण्यासाठी, तळोजा मध्यवर्ती कारागृहाला भेटीचे आयोजन महाविद्यालयाने शेवटच्या सत्राच्या एलएलबीच्या तीन वर्षे आणि पाच वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी केले होते. त्यासाठी तुरुंग प्रशासनाची विशेष परवानगी घेण्यात आली होती.

ही भेट मुख्याध्यापिका धनश्री कदम, डॉ. अमिताभ गवळे, प्रा. सागर देवघरे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि. १८) झाली. या वेळी एकूण ३५ विद्यार्थ्यांनी भेट दिली. या कारागृह भेटीदरम्यान कडक सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची नावे आगाऊ कळवणे, विद्यार्थ्यांच्या यादीनुसार रोल कॉल करणे, ओळख पत्राव्यतिरिक्त कशालाही परवानगी नव्हती, जी अनिवार्य होती, पाण्याची बाटलीही आत नेण्याची परवानगी नव्हती.



एकदा कारागृहात प्रवेश केल्यावर, एस. डी. पिसे, जेलर आणि पी. एम. जाधव यांनी भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते खूप सहकार्य पुर्ण होते आणि त्यांनी आम्हाला 'अंडा सेल' म्हणून ओळखले जाणारे आणि सॉलिटरी कॉन्फाइनमेंट सेल व उच्च सुरक्षा कक्ष वगळता, कारागृहाचा संपूर्ण परिसर दाखवला.

अधिकाऱ्याने माहिती दिली की, एकूण पाच स्वतंत्र तुरुंग युनिट्स आहेत, ज्यांचा उपयोग कैद्यांना वेगळेवेगळे ठेवण्यासाठी केला जातो जसे की, वयोवृद्ध,कच्चे कैदी, १८ ते २३ वयोगटातील, कठोर कैदी इत्यादी. विद्यार्थ्यांना असेही सांगण्यात आले की काही उच्च प्रोफाइल कैदी ठेवण्यात उच्च सुरक्षा सेलमध्ये ठेवण्यात आले आहेत.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना असे दिसून आले की, कारागृह अधिकारी कारागृह यंत्रणेसाठी निर्धारित निकषांचे पालन करत आहेत आणि ते मंजूर क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांना ठेवण्यासही बाध्य आहेत. तसेचते कैद्यांसाठी सुधारात्मक दृष्टिकोन अवलंबत आहेत.

पुढे आम्ही पाहिले की कैदी हे कारागृह प्रशासनाचा भाग कसे आहेत आणि शिस्त राखण्याहत कारागृह प्रशासनाला कशी मदत करतात. कारागृह प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. ही भेट निश्चितच माहितीपूर्ण आणि उपयुक्त होती आणि विद्यार्थ्यांना तुरुंग आणि कारागृह प्रशासनाविषयी माहिती मिळाली.

## दुखवटा

### अशोक सोनवणे



**मोहोपाडा :** तुराडे येथील डिंपल ड्रम्स कंपनीचे कर्मचारी अशोक आनंदा सोनवणे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन,अविवाहित मुले असा परिवार आहे. अशोक सोनवणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते होते. ते विविध धार्मिक सामाजिक संघटनेमध्ये अत्यंत सक्रिय होते. त्यांच्या दुःखद निधनाचे वृत्त समजताच परिसरातील सर्व स्तरातील समाज बांधवांवर आणि रिक्षा चालक-मालक संघटना यांच्यावर तीव्र शोककळा पसरली आहे. रविवार १९ मार्च रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या शिवनगर येथील राहत्या घरापासून अंत्यविधीला सुरुवात होणार आहे आणि त्यांचा अंत्यविधी येथील रिस येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहे.

### दत्तात्रय माने

**अलिबाग :** रायगडचे जिल्हा शासकीय रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांचे वडील शाहूपुरी येथील सेवानिवृत्त नायब तहसीलदार दत्तात्रय ज्ञानोबा माने (वय ८१) यांचे शुक्रवारी (दि. १७) सकाळी आजारपणामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी, सूना व नातवंडे असा परिवार आहे.

दत्तात्रय माने शासकीय सेवेतून निवृत्त झाले होते. ते १९५७ रोजी महसूल खात्यात कनिष्ठ लिपिक पदावर रूजू झाले होते. त्यांनी मेढा, सातारा, फलटण, कोरेगाव येथे वरिष्ठ लिपिक, तर वडूथ-आरळे (ता. सातारा) येथे मंडलाधिकारी म्हणून काम पाहिले. २००१ रोजी ते सातारा नायब तहसीलदार पदावरून सेवानिवृत्त झाले. निवृत्तीनंतर सामाजिक कामात त्यांचा पुढाकार होता. काही दिवसापासून माने गंभीर आजाराने ग्रस्त होते. पुणे येथे उपचार दरम्यान त्यांची शुक्रवारी निधन झाले.

# छत्रपतींच्या नावानेच शाळा आणि क्रिकेटची सुरुवात

## भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

शाळेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या धड्याने आणि माझ्या क्रिकेटची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज मैदानात झाली, अशा शब्दांत भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी शनिवारी (दि. १८) भावना व्यक्त केल्या.

दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी जाणता राजा या महानाट्याचे प्रयोग आयोजित केले असून पहिल्या प्रयोगा पासूनच हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळत आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पहिली आरती करुन प्रयोगांच्या मालिकेला सुरुवात झाली. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, गायिका उषा मंगेशकर आदींनी हजेरी लावली. तर आज भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी आरती करुन प्रयोगाला शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार ॲड. आशिष शेलार यांनी सचिन तेंडुलकर यांचे स्वागत केले. पाचव्या प्रयोगाला कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, दिग्दर्शक केदार शिंदे, अभिनेते अंकुश चौधरी, अभिनेत्री सना शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रमिक सेनेच्या कर्मचाऱ्यांनाही कायमस्वरूपी करणार -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमामध्ये अभियांत्रिकी विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या श्रमिक सेना संघटनेच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी निवेदनही देण्यात आले. ज्याप्रमाणे नवी मुंबईतील १६३ प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करण्यात आले त्याचप्रमाणे आपल्यालाही कायमस्वरूपी करण्यात येईल, असे आश्वासन आमदार मंदा म्हात्रे यांनी त्यांना दिले.

या वेळी हे कर्मचारी गेल्या १२ वर्षापासून परिवह सेवेमध्ये कार्यरत असून त्यांची नियुक्ती ही विहित मार्गाने, नियमानुसार तसेच जाहिरात काढून मुलाखती घेऊन करण्यात आली असूनही त्यांना कायमस्वरूपी केले जात नसल्याची खंतही यावेळी त्यांनी व्यक्त केली.

आमदार म्हात्रे यांनी सांगितले, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमातील अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी हे गेली १२ वर्षांपासून सेवा देत आहेत. विशेष म्हणजे त्यांची झालेली नियुक्ती ही विहित मार्गाने व मुलाखती घेऊन करण्यात आलेली आहे. त्यामध्ये मॅकेनिकल ३६ व मदतनीस ५४ असे कर्मचारी कार्यरत आहेत. ते श्रमिक सेना संघटना युनियनमध्ये काम करित असून अनेक वर्षे न्याय मिळाला नसल्याने आज त्यांनी माझी निवासस्थानी भेट घेतली. त्यांची मागणी रास्त असून अनेक वर्षे मागणी तसेच पाठपुरावा करूनही त्यांना न्याय मिळत नाही हि खेदाची बाब आहे. गेल्या महिन्यात नवी मुंबई महापालिका आस्थापनेवरील १६३ प्रकल्पग्रस्त कर्मचारी कायमस्वरूपी करण्यात आले. परिवहन कर्मचारीही कायमस्वरूपी व्हावे, अशी आशा घेऊन ते माझ्याकडे आलेले आहेत. त्यांना नक्कीच न्याय देण्याचे काम मी करणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## निवडक

### फसवणूक करून रक्कम लाटली

**पनवेल :** एका व्यक्तीच्या मोबाईलवर अज्ञाताने फोन करून त्यानंतर त्याचे गुगल पे हॅक करून त्याच्या बँकेतील बचत खात्यातून दोन लाख नऊ हजार ९९९ रुपये काढून घेऊन त्याची फसवणूक केल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये घडली आहे. दत्तात्रय शेडगे हे तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कंपनीत कामावर असताना त्यांना एका अज्ञात व्यक्तीने फोन करून त्यानंतर त्यांचे गुगल पे हॅक केले. यानंतर त्यांच्या बँकेतील बचत खात्यातून दोन लाख नऊ हजार ९९९ रुपये काढून घेऊन त्याची फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सोन्याची गंठण खेचून दोघे पसार

**पनवेल :** बस स्टॉपवर रिक्षाची वाट पाहत असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सहा तोळे वजनाची सोन्याची गंठण खेचून दोघे जण बुलेट मोटरसायकलीवरून पसार झाल्याची घटना पनवेलजवळील नावडे गाव बस स्टॉप येथे घडली आहे. मीरा घरत (वय ५७) या बस स्टॉपवर रिक्षाची वाट पाहत उभ्या असताना काळ्या रंगाच्या बुलेट वरून आलेल्या मोटरसायकलींवरील मागे बसलेल्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची गंठण खेचली. यानंतर दोघे पसार झाले. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** रेल्वे स्टेशन पार्किंगसमोरील झोपडपट्टीत



राहणारी एक महिला कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जिलू गोविंद सलाड (वय २२) असे बेपत्ता महिलेचे नाव असून तिची उंची चार फूट, रंग सावळा, डोक्यावरील केस काळे लांब, नाक सरळ, नाकात मुरणी, गळ्यात मंगळसूत्र, चेहरा गोल असून अंगात लाल पंजाबी ड्रेस, लाल सलवार त्यावर काळे ठीपके व मेंहदी रंगाची ओढणी, पायात काळी चप्पल, तिला बंजारा व हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार सतीश जवरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नारपोलीतील शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

## आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाला लागलेली गळती सुरूच असून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नारपोली येथील शेकापचे कार्यकर्ते कृष्णा मोरे यांनी शनिवारी (दि. १८) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे आमदार महेश बालदी यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.



(छाया : विकास म्हात्रे)

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, गुळसुंदे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, पंचायत समिती विभाग अध्यक्ष सुनील माळी, पोयंजे पंचायत समिती विभाग अध्यक्ष प्रवीण ठाकूर, वावेघर ग्रामपंचायतीचे सरपंच विजय चव्हाण, सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रशांत माळी, झोपडपट्टी सेल तालुका अध्यक्ष महादेव कांबळे, सावळे तंटामुक्ती कमिटी माजी अध्यक्ष रामचंद्र केदारी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते कृष्णा मोरे यांच्यासह कान्हा मोरे, तुकाराम मोरे, युवा कार्यकर्ते सुमित मोरे, अभिषेक मोरे, कौशल मोरे, संकेत मोरे, अभिजित मोरे, भावेश मोरे या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाजपचे विकासाचे कमळ हाती घेतले. सर्वांचे स्वागत करण्यात आले.

दरम्यान, भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्वांचे पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

### कामोठ्यात एटीएम मशीनमध्ये छेडछाड

#### दहा हजारांची रक्कम काढली; गुन्हा दाखल




**पनवेल : वार्ताहर**

फसवणूक, चोरीच्या घटनांत वाढ होत असतानाच कामोठे परिसरातील एटीएम मशीनमध्ये छेडछाड करून त्यामधून दहा हजार रुपयांचे रोख रक्कम काढून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे सेक्टर ३६ येथील आंबे श्रद्धा सोसायटी येथे असणाऱ्या शरद सहकारी बँक लिमिटेड एटीएम सेंटरमध्ये एका अनोळखी व्यक्तीने प्रवेश केला व आतमधील मशीनमध्ये चावीच्या सहाय्याने उघडून त्यामधून दहा हजार रुपयांचे रोख रक्कम काढून नेले. याप्रकरणी शरद सहकारी बँकचे शाखा व्यवस्थापक रोहिदास डुकरे यांनी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार दाखल केली आहे.

### पनवेलमध्ये पावसाळापूर्व नालेसफाईला सुरुवात

#### माजी नगरसेविका दर्शना भोईर यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीत येणाऱ्या लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी येथे पावसाळापूर्व नालेसफाई कामास सुरुवात झाली आहे. या कामी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी आमदार प्रशांत ठाकूर व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला.



पनवेलमधील लक्ष्मी वसाहत झोपडपट्टीमध्ये अरुंद रस्ते असल्याने अंतर्गत नालेसफाई वेळोवेळी करणे गरजेचे असते. पावसाळ्यात या वसाहतीमध्ये पाणी साचण्याची समस्या निर्माण होते. त्या पार्श्वभूमीवर माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी समस्येचे गांभीर्य लक्षात घेत पनवेल महापालिकेमार्फत लक्ष्मी वसाहत झोपडपट्टीमधील पावसाळापूर्व नालेसफाई करवून घेतली. दरम्यान, पावसाळ्यात पाण्याचा निचरा होऊन जनजीवन विस्कळीत होणार नसल्याने येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

नालेसफाईच्या पाहणीवेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्यासह पनवेल महापालिकेचे एसआय महेंद्र भोईर, संतोष ढगे, चंद्रकांत मंजुळे, मनिष निपाणीकर, भरत जाधव, लखन जाधव, निलेश धोत्रे, विकी लहाने, नितेश मंजुळे आदी उपस्थित होते.

### खांदा वसाहतीमध्ये सोनारावर चाकूहल्ला; आरोपी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने सोनारावर चाकूहल्ला करून दागिने घेऊन पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका इसमास जागृत नागरिकांनी पकडल्याची घटना पनवेल जवळील खांदा वसाहतीमध्ये घडली आहे.

सुखविंदर जसबीरसिंग धामी (वय ३२) या लुटारुचे नाव असून मुकेश जैन यांचे खांदा कॉलनीत विजयश्री नावाचे ज्वेलर्स दुकान आहे. आरोपी सुखविंदर धामी हा जैन यांच्या दुकानात दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने गेला होता. या वेळी त्याने सोन्याच्या तीन चेन पसंत केल्यानंतर दागिने घेऊन पळून जाण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यामुळे जैन यांनी त्याला अडवल्यानंतर त्याने त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. त्यानंतर तो सोन्याच्या तीन चेन घेऊन पळून जात असताना जैन यांनी आरडाओरड केली. त्यामुळे भागातील नागरिकांनी सुखविंदरला पकडून बेदम मारहाण केली व त्याला पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

## खारघर, कामोठे येथे भाजप अनुसूचित जाती मोर्चाची बैठक





**तळोजा : रामप्रहर वृत्त**

भाजप अनुसूचित जाती मोर्चाची खारघर-तळोजा मंडलची व कामोठे शहर मंडलची बैठक शुक्रवारी (दि. १७) आयोजित करण्यात आली होती. खारघर-तळोजा मंडलची बैठक भाजप मध्यवर्ती कार्यालय, खारघर या ठिकाणी तर कामोठे शहर मंडलची बैठक भाजप मध्यवर्ती कार्यालय, कामोठे येथे माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

या बैठकीत पक्षाने मागासवर्गीय समाजासाठी केलेल्या विधायक कार्याची माहिती देवून समाजाचा विकास कसा साधावा. यावर चर्चा करण्यात आली तसेच बुथ विस्तारक अभियानाची माहिती देण्यात आली.

या बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष अरुण सोळंकी, सरचिटणीस अमित जाधव, पनवेल शहराध्यक्ष श्याम साळवी, चिटणीस अमोल जाधव, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, चिटणीस दीपक शिंदे, सिमा खडसे, अनिल साबणे, सुरेश गायकवाड, दिपक मच्छीगर, दिलीप गायकवाड, राजेंद्र जिगे, प्रकाश ओव्हळ, किशोर जाधव, अविनाश कांबळे, सुरेंद्र हल्लिकार, सीमा साबळे, वैशाली साबळे, शशांक जाधव, ज्योती रायबोले, अमोल जाधव, भावेश साबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सफाई कामगारांना वारसा हक्काच्या लाभासंदर्भात पनवेल महापालिकेतर्फे मार्गदर्शन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेतील सर्व कायम सफाई कामगारांना वारसा हक्कांच्या लाभाबाबत माहिती देण्याकरिता शुक्रवारी (दि. १७) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती.

या वेळी सहाय्यक आयुक्त नामदेव पिचड, स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, प्रभाग अधिकारी दीपक शिलकन, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड,




रोशन माळी, सर्व स्वच्छता निरीक्षक, सफाई कर्मचारी आदी उपस्थित होते. या वेळी महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने लाड-पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या सुधारीत तरतुदीबाबत सफाई कामगारांना माहीती देण्यात आली.

पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागात कार्यरत कायम सफाई कामगारांना लाड-पागे समिती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वारसा हक्काबाबत, सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्त झाल्यावर, वैद्यकियदृष्ट्या अपात्र झाल्यास, सेवेत असताना दिवंगत झाल्यावर मिळणाऱ्या लाभाबाबत माहिती देण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांनी घ्यावयाची दक्षता, नियुक्ती प्राधिकरण समितीच्या जबाबदाऱ्या याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

महापालिकेने २०१८पासून लाड-पागे शिफारशीखाली ४६ वारसदारांना तसेच अनुकंपाखाली २५ वारसदारांना नोकरीचा लाभ दिला आहे. महापालिका प्रशासनाने बैठकीमध्ये दिलेल्या या माहितीबद्दल सफाई कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी सतीश चिंडालिया यांनी समाधान व्यक्त करून पालिका प्रशासनाचे आभार मानले.

## विसपुते कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'चांगले आरोग्य हीच खरी संपत्ती' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेल यांच्या माध्यमातून इंटरनल क्वालिटी ॲन्शुरन्स सेल (आयक्यूएएस) अंतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. १८) 'पॉलिस्ट्रिक ओव्हरी सिंड्रोम व महिलांची आरोग्य तपासणी शिबिर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जयंती कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आदर्श शैक्षणिक समूहाच्या संचालिका संगीता विसपुते, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ तथा पनवेल येथील अश्विनी हॉस्पिटलचे डॉ. केशव रघुवीर पै, श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्या डॉ. सीमा



कांबळे, प्रथमेश पुंडे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेच्या संचालिका संगीता विसपुते यांनी महिलांना सुपर वुमन असे संबोधित करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. डॉ. केशव पै यांनी महिलांच्या गर्भाशयविषयीच्या विविध समस्यांविषयी जागृती निर्माण करून विद्यार्थिनींच्या वेगवेगळ्या समस्यांचे निरसन केले. या वेळी महिलांची हिमोग्लोबिन, शुगर, ब्लडप्रेशर तपासणी करून संतुलित आहार कसा असावा याबाबत मार्गदर्शन करून महिलांना संतुलीत आहाराचा तक्ता देण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात महिलांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे महिलांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. त्या संदर्भात जाणीव व जागृती करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाला विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी १००हुन अधिक विद्यार्थिनीचीं मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

### पनवेलमध्ये श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षी प्रमाणे यंदाही पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे प. पु. सद्गुरू नाना महाराज परांजपे यांच्या कृपाशीर्वादाने श्री स्वामी समर्थ प्रकट दीन सोहळा साजरा केला जाणार आहे.

गुरुवारी (दि. २३) शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे पहाटे ५ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची काकड आरती, सकाळी ७.३० नित्यनैमत्तिक पूजा, लघु रूद्र, गुरू पाद्यपूजन आणि आरती, स्वामी प्रकट दिन आध्यय वाचन, स्वामी प्रगट दीन सोहळा, श्री दत्त गायत्री होम, श्री स्वामी समर्थ महिला मंडळाचे भजन, श्री गुरुवर्य मठाधिपती सुधाकर भाऊ यांचे प्रवचन, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन आगरी समाज हॉल येथे करण्यात आले आहे.

रात्री १० पासून भजन सोहळा होणार आहे. स्वामीभक्तांनी या सोहळ्यास उपस्थिती ठेवावी, असे आवाहन अवधूत सुधाकर घरत यांनी केले आहे.



# अवलिया सतीश कौशिक





**अतिशय घट्ट मैत्रीतील सर्वांत अवघड क्षण कोणता? आपल्याच जीवलग मित्राच्या मृत्यूची बातमी इतरांना देणे. अनुपम खेरवर ९ मार्चच्या अगदीच पहाटे अशीच दुर्दैवी वेळ आली. त्यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटले, जानता हू 'मृत्यू ही इस जीवन का अंतिम सच है...पर यह बात जीते जी कभी अपने दोस्त सतीश कौशिक के बारे मे लिखूंगा...यह मैने सपने भी नहीं सोचा था, ४५ साल की दोस्ती पर एसे अचानक पूर्ण विराम दू...**

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक


या दिवसाची सुरुवात अशा दुर्दैवी आणि दुःखद बातमीने झाली...आणि माझ्या डोळ्यासमोर सतीश कौशिकचा अष्टपैलू कारकिर्दीचा पट आणि त्याच्या काही भेटीचे योग आले. वयाच्या ६६ व्या वर्षी त्याने एक्झिट घेतली..

आयुष्य कसे असते बघा, अगोदर मुंबईत आणि मग दिल्लीत आदल्या दिवशी धूलिवंदन, रंगोत्सव साजरा करणारा कलाकार अवघ्या काही तासांमध्ये या जगाला निरोप देतो...या मृत्यूबाबत निर्माण झालेले संशयाचे धुके त्याच्या पत्नीने वेळीच खुलासा केल्याने दूर झाले.

दोन दिवसांनी अनुपम खेरने आणखीन एक ट्वीट करीत म्हटले, जिंदगी तो आगे बढानी पडती है...मै जिंदगी को आगे बढा रहा हू मेरे दोस्त...तुम हमेशा मेरे जीवन का एक अहम हिस्सा बने रहोगे... अनुपम खेरच्या बोलण्यातील वेदना स्पष्ट जाणवते.

अनुपम खेरच्या म्हणण्यानुसार ७ मार्च रोजी त्याची सतीश कौशिकशी शेवटची भेट झाली...तो, अनुपम खेर व अनिल कपूर हे एकमेकांना भेटणे, मनसोक्त मनमुराद गप्पांत रमणे ही तिघांचीही सवय होती. जवळपास रोजच आठ वाजता एकमेकांना फोन करणे असे.

खरं तर सतीश कौशिक सेल्फ मेड. अभिनयाची कौटुंबिक पूर्वपरंपरा नाही (कुटुंबात फक्त हिन्दुस्तान समाचार हे दैनिक वाचले जाई), कोणाचं कसलंही बॅकिंग नाही, कोणी गॉडफादर नाही, ते शक्यही नव्हतेच म्हणा...ग्लॅमर जगतामध्ये चमकण्यासारखे व्यक्तिमत्व नाही... तरी गुणवत्ता, मेहनत, सकारात्मक दृष्टिकोन यामुळेच सतीश कौशिक घडत घडत गेला. कोणत्याही यशस्वी माणसाचा प्रवास अनेक वळणावळणांचा असतो...महत्वाचे असते ते या प्रवासात स्टेअरिंग आपल्या हाती ठेवणे. सतीश कौशिकला ते जमले. पटकथा लेखन, अभिनय, निर्मिती, दिग्दर्शन, सूत्रसंचालन अशा विविध क्षेत्रांमध्ये कौशिकने.यशस्वी वाटचाल केली...नवी दिल्लीतील करोल बागमध्ये वाढलेल्या सतीश कौशिकला सिनेमाची प्रचंड आवड. अगदी शाळा बुडवून, आईकडून पैसे घेऊन चित्रपट एन्जॉय केले. तो तीन ते पाच वर्षांचा असताना त्याला शाळेत बेस्ट हेल्दी चाईल्ड असा पुरस्कार प्राप्त झाला. त्या काळात चित्रपटांच्या पानभर जाहिराती प्रसिद्ध होत आणि सतीशचे त्यावर लक्ष असे. एके दिवशी सतीश कौशिक यांच्या भावाला आपल्या घरातील वर्तमानपत्रामधल्या सर्व चित्रपटांच्या जाहिरातीवर कोणीतरी काट मारल्याचं दिसलं. हे सर्व चित्रपट आपल्या भावानंच पाहिलेत हे कळल्यानंतर सतीशजींना भरपूर मार पडला. वडिलांनी तर तोंडावर जेवणाची प्लेट मारली अशी एक आठवण सतीश कौशिकने कालांतराने एका मुलाखतीत सांगितली..आणि तीदेखील अतिशय तटस्थपणे! 'अपनी शकल तो देख जरा आईनेमें...' अशी थट्टा त्याच्या वाट्याला आली, परंतु सतीशजींनी ठरवलं होतं, आपण अभिनेताच बनायचं. मेहमूद, जॉनी वॉकर, असरानी यांच्या चित्रपटांचा त्याच्यावर पगडा होता. ती सहजता त्याला भावली. विशेषतः मेहमूद जास्त आवडता. या दिग्गजांप्रमाणेच त्याला कॉमेडियनच बनायचं होतं. त्याच्या मनात येई आपण डॉक्टर बनूयात, पण हे घर १०० टक्के शाकाहारी होतं, तिथं वाढलेला मुलगा बेडूक कसा काय कापू शकणार, असा प्रश्न खुद्द सतीशलाच पडला आणि डॉक्टर बनण्याचा विचार पूर्णतः संपुष्टात आला. त्या काळात तो खूपच आवडीने पराठे खात असे. शालेय जीवनाच्या शेवटच्या दिवशी झालेल्या निरोप समारंभातच सतीशने एक सोलो अक्ट सादर केला आणि उपस्थितांची वाहवा मिळवली. आणि तत्क्षणीच त्याने आपल्या आयुष्याचं ध्येय निश्चित केलं– मला काही झालं तरी, कितीही अडथळे आले तरी कलाकार बनायचंय... नवीन दिल्लीतील राष्ट्रीय नाट्य विद्यालयात (एनएसडी) जुलै १९७५ साली प्रवेश घेऊन तिथं स्वतःमधल्या अभिनेत्यावर चांगले संस्कार केले. तेथेच त्याची अनुपम खेरशी ओळख आणि मग मैत्री झाली. दोघांनी तेथे 'लैला के सिपाही थे' या संगीत नाटकात एकत्र भूमिका केली. आणि संपूर्ण नाटकात त्याला एकमेव संवाद होता. हे दोघे एकाच बेंचवर बसत. तेव्हा अनुपम खेरने उसने घेतलेल्या ऐंशी रुपयातील साठ रुपये परत आले. पण वीस रुपये अजून शिल्लक आहेत असे सतीश कौशिक सांगायचा. त्या काळात ही मोठी रक्कम होती...सुहास खांडके हा त्या काळात या दोघांचा चांगलाच मित्र होता. 'एनएसडी'त शिक्षण घेऊन आलेल्यांना मुंबईतल्या ग्लॅमर जगतामध्ये सहज स्वागत होईल अशी सतीशची भाबडी आशा होती.



मुंबईनं इतरांप्रमाणेच सतीशलाही स्ट्रगल करायला लावले. सुरुवातीच्या दिवसांमध्ये भायखळ्याला एका नातेवाईकांकडे त्यांची राहायची व्यवस्था झाली, परंतु हा मुलगा मुंबईत अभिनेता बनण्यासाठी आलाय हे कळल्यानंतर या नातेवाईकांनी बोलणंच बंद केलं. त्यामुळेच सतीशला हे घर काही दिवसातच सोडावं लागलं आणि मग काही दिवस याच्याकडे राहा, त्याच्याकडे राहा, असं करत करत दिवस ढकलावे लागले. अभिनेता बनायला आलेल्या सतीशजींनी एका टेक्स्टाइल मिलमध्ये कॅशियरची नोकरी पत्करली. नोकरीच्या पहिल्याच दिवशी मालकानं सतीशजींना आपल्या मिलमधील एक खोलीदेखील साफ करायला लावली असा एक किस्सा प्रसिद्ध आहे. त्यावेळी काही क्षण सतीशजींच्या मनाची चलबिचल झाली, पण सतीशने तेही केले. या काळात अनुपम खेरही मुंबईत आला आणि त्याचाही संघर्ष सुरू होताच. तोही इकडेतिकडे राहत असतातच किरण खेरशी असलेल्या ओळखीतून ते तिला भेटायला जात, तेव्हा ती या दोघांना टॅक्सीचे पैसे देत. पण ते बसने प्रवास करीत. पैसे जपून वापरायची त्यांना यातून सवय लागली. यात अभिनयाची आवड काही त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. दिवसभर मिलमधील नोकरी आणि सायंकाळी जुहूच्या 'पृथ्वी' थिएटरमधील नाटकं असा त्याचा प्रवास सुरू झाला. एके दिवशी मिलच्या मालकाच्या पाहण्यात सतीशजींचा अभिनय आला आणि ते आश्चर्यचकीत झाले. आकर्षक चेहरा नि शरीरयष्टी नसूनही हा मुलगा प्रेक्षकांचं मनमुराद मनोरंजन कसं काय करू शकतो, असा त्यांना प्रश्न पडला होता. अभिनयाची संधी आपल्याला मिळत नाहीय, हे लक्षात आल्यानंतर सतीशजींनी आपला मोर्चा दिग्दर्शनाकडे वळवला. शेखर कपूर त्या वेळी 'मासूम'मध्ये बिझी होता. सतीश या चित्रपटाचा सहाय्यक दिग्दर्शक बनले. अशा प्रकारे सहाय्यक दिग्दर्शन आणि छोट्या छोट्या भूमिका असा त्यांचा प्रवास सुरू झाला.

दिग्दर्शक श्याम बेनेगल हे 'मंडी' चित्रपट करताहेत याची 'पृथ्वी थिएटर'मध्ये सतत कुजबूज होत होती. म्हणून सतीश त्यांच्या ताडदेव येथील कार्यालयात गेला. तासभर वाट पाहिली. त्यात एक चहा मिळाल्याने सतीश कौशिक सुखावला. श्याम बेनेगल छायाचित्रं मागितल्यानंतर सतीशने चक्क करावं काय... त्याने हसत हसत आपला एक्स–रे रिपोर्ट त्यांना दाखवला. सतीशचे हे वागणे श्याम बेनेगल यांना आवडले आणि त्याची 'मंडी'मधील छोट्या भूमिकेसाठी निवड केली. जयवंत दळवी यांच्या लेखनावरील रवींद्र धर्मराज दिग्दर्शित 'चक्र' हा त्याचा अभिनेता म्हणून पहिला चित्रपट. कुंदन शहा दिग्दर्शित 'जाने भी दो यारो', पंकज पराशर दिग्दर्शित 'जलवा', यादोन भिन्न स्वरुपाच्या.पटकथा सतीश कौशिकने सुरुवातीच्याकाळात लिहिल्या.. 'जाने भी दो यारो' त्यांनी लिहिला तो रणजीत कपूरबरोबर. या चित्रपटाची स्क्रिप्ट लिहिण्याचंही तंत्र अगदी वेगळं होतं. सतीशजींनी आपल्या मनातील संवाद आधी रेकॉर्ड केले आणि मग या दोघांनी मिळून स्क्रिप्ट लिहिली. एकादा चित्रपट असाही आकार घेत असतो. बापू दिग्दर्शित 'वो सात दिन' या चित्रपटातील भूमिकेचे बोनी कपूरने दोनशे रुपये ठरले असताना पाचशे रुपये दिले. याच चित्रपटाच्यासेटवर त्याची अनिल कपूरशी मैत्री झाली. 'मासूम', 'जोशीले' केल्यामुळे 'मि. इंडिया' मिळाला. पटकथा लेखक जावेद अख्तरची साथ मिळाल्यानंतर सतीशजींमधला लेखक अधिक खुलला. जावेदजींकडून 'कॅलेंडर' पात्राची निर्मिती करून घेतली. आता मैत्री वाढल्याने अनिल कपूर त्याला आपला फॅमिली मेंबर मानू लागला. 'मिस्टर इंडिया'मध्ये सतीशजींनी स्वतः ला एवढं झोकून दिलं तर तेव्हाच तो सहाय्यक दिग्दर्शक म्हणून चक्क टेबलावर बसून सूचना द्यायचा. बोनी कपूरला सुरुवातीला ते विचित्र वाटले. मग मात्र ती त्याच्या कामाची पद्धत वाटली. 'मिस्टर इंडिया'च्या सुपर हिटनंतर 'रुप की रानी चोरोंका राजा' शेखर कपूरच दिग्दर्शित करीत होता. शेखर कपूरने अनेक चित्रपटांप्रमाणेच हाही चित्रपट सोडला आणि तो सतीश कौशिककडे आला. त्याचे हे पहिलेच दिग्दर्शन. आणि चित्रपट महाखर्चिक व महाचर्तित हा चित्रपट बनायला तब्बल पाच सहा वर्षं लागली. यातील एका गाण्याच्या चित्रीकरण तर १९ दिवस चालले. याचे त्या काळात बजेट ८ कोटी रुपये होतं. तीस वर्षांपूर्वी ही खूपच मोठी रक्कम होती.पहिल्याच दिवशी चित्रपट आपटला. मुंबईत मेन थिएटर मिनर्व्हात शो रिकामे जाऊ लागले.

रुप की रानी...चे देशभरात एकूण नऊ प्रीमियर झाले तरी पिक्चर फ्लॉप. या अपयशाने सतीशच्या आत्महत्येचे विचारही त्याच्या मनात डोकावले होते. हैदराबादला असताना हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरून खाली उडी मारायचा त्याचा प्लॅन होता, पण नेमकं खाली जेवणाच्या रिसेप्शनची टेबलं–खुर्च्या मांडली होती. त्यामुळे 'ये खाने के चक्करमें तो निचे गिरा नहीं ना...' असं लोकांना वाटेल या विचारानं त्याने आत्महत्येचा प्लॅन कॅन्सल केला. हेही तो हसत खेळत सांगायचा. याच सेन्स ऑफ ह्युमरमुळे सतीशजी प्रत्येक संकटावर मात करण्यात यशस्वी ठरले. 'रुप की रानी' बनत असतानाच कपूर कुटुंबियांचं शेंडेफळ असलेल्या संजय कपूरचं पदार्पण असलेला 'प्रेम'देखील खूपच रखडून प्रदर्शित झाला. पुनर्जन्मावरचा हा चित्रपट फ्लॉप झाला.. संजय कपूर व तब्बू यांच्या रोमॅन्टीक भूमिका होत्या. सुदैवाने गोविंदा–सतीश कौशिक आणि डेव्हिड धवन असं त्रिकुट एकत्र आलं नि त्यांनी क्यों की मै झूठ नहीं बोलता, हसिना मान जाऐगी, साजन चले ससुराल, स्वर्ग, दीवाना मस्ताना. इत्यादी चित्रपटात धमाल उडवली. प्रेक्षकांना मनमुराद हसवलं. कॅलेंडरपाठोपाठ पप्पू पेजर, मुथ्थूस्वामी या त्याच्या कॅरॅक्टर्सनी जबरा भाव खाल्ला. 'रुप की रानी'च्या फ्लॉपचा त्यांने एवढा धसका घेतला होता की, एकदा बाहेरगावी असताना हॉटेल सोडत असतानाच सगळ्या गोष्टी तपासून घेत असतानाच रुममधील टीव्हीवर हा चित्रपट हा चित्रपट सुरु असतानाच त्याने पटकन रिमोटनं टीव्ही बंद केला होता ही आठवण सांगतानाही सतीश कौशिक हसायचा हे विशेषच. या चित्रपटाच्या फ्लॉपची जबाबदारी आपल्यावर घेतली.

भारताचा सर्वांत मोठा सुपर फ्लॉप चित्रपट म्हणजे रुप की रानी... असे सतिश कौशिक कायमच म्हणायचा. त्याच्या या म्हणण्यातील दुःखाची किनार कधीच लपली नाही. अनिल कपूरनं 'हम आपके दिलमें रहते है' चित्रपटासाठी दिग्दर्शक म्हणून निर्माते डी. रामानायडू यांना सतीशजींचं नाव सुचवलं असा किस्सा प्रसिद्ध आहे. या चित्रपटात अनिल कपूर व काजोल अशी जोडी होती. आणि या चित्रपटाच्या हैदराबाद येथील रामा नायडू स्टुडिओत शूटिंग रिपोर्टींगला जाण्याची संधी आली असता सतिश कौशिकने मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांशी अतिशय मोकळेपणाने गप्पा केल्या. त्याने तेरे नाम, मुझे कुछ कहना है इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. एकदा त्याला 'ब्रिकलेन' या हॉलिवुडपटाची संधी आली असता त्याने कसलेही आढेवेढे न घेता स्क्रीन टेस्ट दिली. विशेष म्हणजे, या स्क्रीन टेस्टसाठी त्यांनी दोन नवीन सूट एका रात्रीत शिवून घेतले. कलाकार, सूत्रसंचालक, निर्माता, दिग्दर्शक असा तो अष्टपैलू होता. काळासोबत आपल्यात बदल करीत ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी चित्रपट दिग्दर्शित केला. 'सेल्समन रामलाल' या नाटकामुळे त्यांचं रंगभूमीवरील कर्तृत्व जगासमोर आलं. अनुपम खेर यांच्याबरोबर चित्रपट निर्मिती करायची वेळ आली तेव्हा त्यांनी आपल्या प्रॉडक्शन हाऊसला बालपणीच्या करोलबागचं नाव दिलं आणि 'तेरे संग' पडद्यावर आणला. सतिश कौशिक एन्टरटेन्मेन्ट हेदेखील त्याचेच बॅनर.

आपल्याला मुंबईने, महाराष्ट्राने बरेच काही दिले याची जाणीव ठेवून त्याने मन उधाण वारा या मराठी चित्रपटाची निर्मिती केली. संजय मेमाणे दिग्दर्शित हा चित्रपट कोकणातील कथेच्या पाश्र्वभूमीवर होता. या चित्रपटाच्या फर्स्ट लूकला सतिश कौशिक आवर्जून हजर राहिला असता त्याच्याशी संवाद साधता आला. तेव्हा तो कुठेही फिल्मी वाटला नाही. हरयाना, चंदिगढ येथील चित्रपटसृष्टीसाठी त्याने मदत केली. मला आठवतयं तो हरयाणातील मोबाईल थिएटरमधून मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांशी संवाद साधला होता. सतीशची त्याची विनोदबुद्धी मस्त होती. 'हर फिक्र को धुएमें उडाता चला गया...' हे त्यांचं आयुष्याचे आणि त्याला सूट होणारे तत्वज्ञान. नव्वदच्या दशकात अवघ्या दोन वर्षांच्या मुलाला त्याने अकाली गमावलं. पण त्यावेळी अभिनेता म्हणून एवढं काम होतं की, मुलाच्या निधनानंतर शोक करायलाही त्यांना वेळ मिळाला नाही. इतका तो बिझी होता. एका अर्थाने ते चांगलेच झाले. कारण त्यातून तो लवकर बाहेर पडला. त्यानंतर तब्बल १६ वर्षांनी त्यांच्या घरी मुलगी जन्माला आली आणि ५६व्या वर्षी सतीशला पुन्हा पितृत्व मिळालं. याकडेही त्याने खेळकर दृष्टिकोनातून पाहिलं. चित्रपटसृष्टीत अस्सल खऱ्या मैत्रीची उदाहरणे खूपच कमी त्यात अनिल कपूर, अनुपम खेर, बोनी कपूर ही तर त्याचे खास मित्र. कॉमेडी करणे सोपे नाही असे मानणारा सतीश कौशिक स्वतःकडे विनोदी दृष्टिकोनातून पाह्यचा. त्यासाठी एक वेगळीच मानसिकता लागते ती त्याच्याकडे नक्कीच होती. कॉमेडीमध्ये टायमिंगला महत्त्व असतं, असं जवळपास सर्वच विनोदवीरांचे म्हणणे असते. सतीश कौशिक यांनी पूर्णपणे ॲक्टीव्ह असताना त्यांनी या जगाचा निरोप घेतला. उत्तरार्धातील चित्रपट छान रंगला असतानाच त्याचा अगदीच अनपेक्षिततणे 'शेवट' (दी एण्ड) व्हावा असेच हे झाले. माणसाच्या आयुष्याचे रिळ कधी अचानक तुटेल हे कोणीच सांगू शकत नाही हेच खरे. शेवटी सतिश कौशिक जणू असेच सांगून गेले, हमारा दिल आपके पास है...

# केंद्र शासन सहाय्यित कृषी योजना

ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि निसर्गसौंदर्याने नटलेला रायगड जिल्हा भात उत्पादनाचे कोठार आहे. नाचणी हे पौष्टिक तृणधान्य सुद्धा येथे मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. तर उरणपासून श्रीवर्धनपर्यंतच्या सागरी किनाऱ्यामुळे मत्स्य व इतर सागरी उत्पादने ही सुद्धा रायगडची वैशिट्यपूर्ण ओळख आहे. मुंबई महानगराची नजीकता जिल्ह्याच्या कृषी बरोबरच औद्योगिक विकासाला चालना देत आहे.

जिल्ह्यामध्ये कृषी यांत्रिकरण योजनेत दोन हजार ६८ लाभार्थ्यांनी, सामुहिक शेततळे योजनेत ३५ लाभार्थ्यांनी, कृषी व मत्स्य प्रक्रिया उद्योग योजनेत १६ लाभार्थ्यांनी, भाजीपाला रोपवाटीका योजनेत १७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत तीन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झाल्या आहेत. या योजनांमधील शेतकरी सहभाग मोठ्या प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे. आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, जांभूळ यांची लागवड करणे, त्यावरील प्रक्रिया उद्योग उभारणे, कृषी पर्यटन, इत्यादीमध्ये नवयुवक शेतकऱ्यांना खूप संधी आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये भात, नाचणी, आंबा, काजू ही पिके मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांची उत्पादकता १० ते २५ टक्क्यांनी वाढविण्यासाठी कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून तंत्रज्ञान विस्तार कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत नुकसान भरपाई आणि विमा संरक्षण देण्यात येत आहे.

कृषी विभाग पीक उत्पादनाबरोबर काढणीत्तोर व्यवस्थापन प्रक्रिया, साठवणूक इत्यादी प्रकल्पांच्या माध्यमातून कृषी मालाचे मूल्यवर्धन करण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्ह्याला असलेल्या १२२ कि.मी. सागरी किनाऱ्यामुळे एक जिल्हा एक उत्पादन या अंतर्गत 'मत्स्य व इतर सागरी उत्पादने' कार्यक्रमास गती देण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना शेतकऱ्यांना माहीत व्हाव्यात, यासाठी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले व त्यांच्या सहकारी–अधिकाऱ्यांच्या सहकार्याने ही कृषी योजनांची लेख मालिका सुरू करण्यात आली आहे.



**अ) केंद्रशासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना**

**उद्देश :–** असंघटीत उद्योगांना संघटित करणे, कार्यरत असलेले व नवीन स्थापित होणारे वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग तसेच शेतकरी उत्पादक कंपनी, गट, संघटन व सहकारी उत्पादक संस्था यांची पतमर्यादा वाढविणे. फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया, मसाला पिके, मत्स्य, दुग्ध व किरकोळ वन उत्पादनावर आधारित सूक्ष्म अन्न उद्योग.

**पात्र लाभार्थी :–** वैयक्तिक लाभार्थी– युवक, शेतकरी, महिला, उद्योजक, कारागिर, बेरोजगार, भागीदार व मर्यादित दायित्व असलेले भागीदार.

**गट लाभार्थी–** स्वयंसहाय्यता गट उत्पादक गट/ संस्था/ कंपनी, उत्पादक सहकारी संस्था इ.

**लाभार्थी निकष :–** अर्जदार उद्योगावर मालकी अधिकार (प्रोप्रायटरी भागीदारी).

**वैयक्तिक–** अर्जदाराचे वय १८ वर्ष व किमान ८ वी पास, प्रकल्प किंमतीच्या किमान १० ते ४० टक्के लाभार्थी हिस्सा देण्याची व उर्वरित बँक कर्ज घेण्याची तयारी असावी.

**गट–** एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) धोरणानुसार निवडलेल्या उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये कार्यरत फार्मर प्रोड्यूसर गट (FPO), स्वयंसहाय्यता गट (SHG), उत्पादक सहकारी संस्था यांच्या नवीन उद्योगांना प्राधान्य तसेच एक जिल्हा एक उत्पादन नसलेल्या (Non-ODOP) उत्पादनांनादेखील नवीन उद्योगांना लाभ देय आहे. फार्मर प्रोड्यूसर गट (FPO), कंपनी, सहकारी उत्पादक यांची उलाढाल किमान एक कोटी असावी. हाताळल्या जाणाऱ्या उत्पादनाबाबत ३ वर्षाचा अनुभव.

**ब) रायगड जिल्ह्याकरिता एक जिल्हा एक उत्पादन मत्स्य व सागरी उत्पादने**

प्रकल्प किंमत व खेळत्या भांडवलासाठी कमीत कमी १० टक्के आणि जास्तीत जास्त ४० टक्के स्वनिधी भरण्यासाठीची तरतूद प्रोड्यूसर गट (FPO), स्वयंसहाय्यता गट (SHG)/उत्पादक सहकारी संस्था यांची असावी किंवा ही रक्कम राज्य शासनाच्या योजनेतून मंजूर असावी. एक जिल्हा एक उत्पादन(ODOP) अंतर्गत नवीन व सद्यःस्थितीत कार्यरत तसेच Non-COOP आणि सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे विस्तारीकरण आधुनिकीकरण करता येते.

**अर्थसहाय्य :–** वैयक्तिक लाभार्थी भांडवली गुंतवणूकीकरिता ३५ टक्के १० लाखा रुपयांपर्यंत,भांडवली गुंतवणूक व सामाईक सुविधा लाभार्थी ३५ टक्केअनुदान कमाल केंद्र शासनाच्या विहित मर्यादेत, मार्केटिंग व ब्रॅडिंग, ५० टक्के अनुदान कमाल केंद्र शासनाच्या विहित मर्यादेत, इन्क्यूबेशन सेंटर, शासकीय संस्था १०० टक्के, खाजगी संस्था ५० टक्के,अनुसूचित जाती व जमाती ६० टक्के, स्वयंसहायता गटांना सदस्यांना बीज भांडवल (MSRLM व MSULM मार्फत) ४० हजार रुपये प्रति सदस्य, प्रशिक्षणासाठी १००० टक्के अनुदान.

अधिक माहितीसाठी www.pmfme.mofpi.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जिल्हा संसाधन व्यक्ती, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क करावा,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**–मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**रायगड–अलिबाग**

# वाढल्या आरोग्याच्या तक्रारी; बदलत्या वातावरणाचा परिणाम

शहरासह जिल्हाभरात गेल्या दोन दिवसांपासून निर्माण झालेले ढगाळ वातावरण, मध्येच कोसळणारा पाऊस अशा स्थितीशी जुळवून घेणे अनेकांना अडचणीचे ठरत आहे. ऋतुबदलाचा मानवी शरीरावर तत्काळ परिणाम होतो. त्यामुळे सध्या ताप, सर्दी–खोकला आदी विकार बळावण्याची शक्यता वाढली आहे, मात्र अशा बदलत्या ऋतुमानात उद्भवणाऱ्या आरोग्यासंदर्भातील समस्यांवर पुरेशी दक्षता हाच रामबाण उपाय ठरू शकतो, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

सध्या अचानक निर्माण झालेले ढगाळ वातावरण आरोग्यास अपायकारक ठरू शकणारे आहे. अशा वातावरणात व्हायरल इन्फेक्शन होण्याची शक्यता वाढते. वातावरण बदलामुळे खोकला, सर्दी, अस्थमा बळावण्यासह स्वाइन फ्लूसारख्या गंभीर आजारांचे विषाणू पसरण्यासही हातभार लागू शकतो. संसर्गजन्य आजारांमुळे रुग्णसंख्याही वाढू शकते. या बदलाशी जुळवून घेण्यास शरीराला काहीसा वेळ लागतो. या समस्येत डासांमुळेदेखील भर पडताना दिसते. त्यामुळे डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे तत्काळ नष्ट करण्यासह आरोग्याच्या समस्यांना दूर ठेवण्यासाठी नागरिकांनी पुरेशी काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला आहे.



सर्दी, खोकला, घशाचे विविध विकार, ताप, डोकेदुखी, उलट्या, जुलाब यांसारखे आजार झाल्यास तत्काळ डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घेणे फायदेशीर ठरू शकेल. अनेक नागरिक घरगुती उपाय करण्यावर भर देतात, मात्र अशावेळी कुठलीही रिस्क घेणे चुकीचे ठरू शकते. आजारी असताना तोंडाला रुमाल बांधावा, लहान मुले आजारी असल्यास त्यांना शाळेमध्ये पाठवू नये, अशी सूचनाही तज्ज्ञांकडून देण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिला, गर्भवती महिला यांच्यावर अशा बदलत्या वातावरणाचा तत्काळ परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सर्वांनीच खालीलप्रमाणे काळजी घेतल्यास आरोग्याच्या समस्यांवर मात करणे शक्य होईल, असे मतही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

वातावरण बदलामुळे वयोवृद्धांचे संधिवातासारखे आजार बळावतात. त्वचा कोरडी पडते आणि जुनाट गुडघेदुखी व पूर्वीपासून असलेले आजार बळावतात. दमा असल्यास दम्याचा वेग तीव्र होतो. या रुग्णांनी धूर, धूळ असणारे रस्ते टाळावेत. डॉक्टरांच्या सल्ल्याने आयुर्वेदिक औषधी तेलांचा मसाज करून पोटातूनही औषधे घ्यावीत. मणक्याच्या विकारांमुळे मान, कंबरदुखी असल्यास काही व्यायाम, योगासने, औषधी तेलाचा मसाज, काढा घेणे आदी उपाय डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार करावेत. गरम पाण्याने आंघोळ करावी. सुंठ व ओवायुक्त पाणी दिवसभरात थोडेथोडे पिल्यास आराम पडू शकतो.

गर्भवती महिलांनी अशा काळात स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी, तसेच बाळाच्या वाढीसाठी हिरव्या पालेभाज्या, फळे व ज्युसचा अधिक वापर करावा. विविध प्रकारचे सूप या काळात लाभदायी ठरतात. मुख्य म्हणजे जेवणाची वेळ पाळत पुरेसा सकस आहार घेणे गरजेचे आहे. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे गर्भावस्थेतील व्यायाम व योगासनेही उपयुक्त ठरू शकतात. लहान मुलांमध्ये या दिवसांत ताप, थंडी, सर्दी, खोकला यांसारखे आजार बळावतात. त्यामुळे आइस्क्रीम, जंक फूड, तळलेले पदार्थ, तसेच प्रीझर्व्हेटिव्ह फूड (डबाबंद, खूप दिवसांचे) मुलांना खायला देणे टाळावे. आयुर्वेदिक उपचारांनुसार लहान मुलांना तुळस व आल्याचा रस मधात दिल्यास फायदा होऊ शकतो. याशिवाय नियमित कोमट पाणी पिण्यास द्यावे. प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी व्हिटॅमिन सीयुक्त असलेली संत्रा, आवळा, मोसंबी आदी फळे खाण्यास द्यावीत. नियमित च्यवनप्राश सेवन करण्यास द्यावे. अर्थातच सर्व बाबी डॉक्टरांच्या सल्ल्याने करणे महत्त्वाचे आहे.

**(साभार : इंटरनेट)**

# आता नेरळमध्येही पांढऱ्या कांद्याची शेती

## कुंभे येथील शेतकऱ्याकडून अर्धा एकरात २००० किलो उत्पादन


**कर्जत : प्रतिनिधी**

अलिबाग येथील गुणकारी औषधी म्हणून ओळख सांगणाऱ्या पांढऱ्या कांद्याची शेती नेरळ जवळील कुंभे येथे केली आहे. अर्धा एकर जमिनीवर केलेली शेती भलतीच यशस्वी ठरली आहे. अंकुश शेळके या शेतकऱ्याने कांदा पिकविला असून तब्बल दोन हजार किलो कांद्याचे उत्पादन झाले.

अलिबाग तालुक्यातील या कांद्याला विशेष मागणी असते. या कांद्याची शेती अलिबाग येथील खाऱ्या वाऱ्याच्या सहवासात अधिक बहरते असे साधारण बोलले जाते परंतु नेरळ जवळील कुंभे येथील शेतकरी शेळके यांनी लागवड केली आहे. कर्जत तालुक्यातील पांढऱ्या कांद्याचा हा पहिलाच प्रयोग असून कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना विशेष प्रोत्साहन दिले जात होते. शेळके यांची उल्हास नदीच्या तीरावर कूंभे येथे शेत जमीन

### अडीच महिन्यांत फुलली शेती

*अंकुश शेळके यांनी त्यासाठी अलिबाग येथील पांढरा कांद्याची शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी अर्धा एकर क्षेत्रात भाताची शेती करून झाल्यावर वाफ्यांवर कांद्याची लागवड केली. अलिबाग जवळील चौंढी येथील प्रगत शेतकरी रमेश चिंबुलकर यांच्याकडून बियाणे आणण्यात आले. त्या बियाणांची लागवड २२ डिसेंबर २०२२ रोजी लागवड झालेला कांदा शेतीसाठी अडीच महिन्यांनी त्यांच्या शेतात कांद्याची शेती फुलली आणि चांगले उत्पादन देणारे पीक बहरले आहे.*



आहे. त्याचवेळी अन्य काळात वेगवेगळी नगदी पिके घेणारे हे हिवाळ्यात कडधान्य तसेच पावसाळी भाताची शेती देखील करणारे शेळके यांनी पांढरा कांद्याची शेती करण्याचा निर्णय घेतला. अवेळी आलेला पाऊस लक्षात घेवून शेतात बहरलेले कांद्याचे हातात आलेले पीक खराब होऊ नये यासाठी कृषी विभागाचे सल्ल्याने कांद्याचे उत्पादन काढण्यास सुरुवात केली. अर्ध्या एकर जमिनीमध्ये काढलेला पांढरा कांद्याचे उत्पादन हे विक्रमी असेच झाले आहे. अर्धा किलो क्षेत्रात २००० किलो कांद्याचे उत्पादन मिळाले आहे. कांदा प्रगत शेतकरी शेळके यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचा योग्य सल्ला घेवून शेतातून बाहेर काढला आहे.

# बूथ विस्तारक अभियान यशस्वी करू!

## भाजपच्या कर्जत तालुका कोअर कमिटीच्या बैठकीत सूर

**कर्जत : प्रतिनिधी**

भाजपच्या कर्जत तालुक्याच्या कोअर कमिटीची बैठक शुक्रवार (दि. १७) सकाळी ११ वाजता भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात कर्जत तालुका संपर्कप्रमुख, ॲड. नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. भारतीय जनता पक्षाच्या 'बुथ विस्तारक अभियान' या कार्यक्रमावर सखोल चर्चा करण्यात आली. त्यावेळी हे अभियान आम्ही यशस्वी करु, असे उपस्थित कार्यकर्त्यांनी ठामपणे सांगितले.

या बैठकीस कर्जत तालुका संपर्क प्रमुख मा. नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, संदीप म्हसकर, दिपक बेहरे, वसंतराव भोईर, राजेश भगत, सुनील गोगटे, नरेश सुरेश मसणे, अशोक धरमचंद ओसवाल, संजय कराळे, नितीन सूर्यकांत कांदळगावकर, स्नेहा सुनील गोगटे, रमेश मुंटे आदी पदाधिकारी, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथ अध्यक्ष, विस्तारक आदि कार्यकर्ते उपस्थित होते.



# खोपोलीत इनरव्हील क्लबच्या कार्यक्रमांना उदंड प्रतिसाद




**खोपोली :** इनरव्हील क्लब खोपोलीतर्फे लोहाणा समाज हॉल येथे महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून गणेश वंदना झाली. नंतर ईनरव्हील अध्यक्षा सारिका धोत्रे यांनी सर्व उपस्थित महिलांना संस्थेबद्दल सर्व माहिती सांगितली. यावर्षी ईनरव्हील ही आंतरराष्ट्रीय संस्था ९९ वर्ष पूर्ण करून १०० व्या वर्षात पदार्पण करत आहे. यावेळी सोलो गायन, सोलो डान्स, गृप डान्स आणि ब्युटी कॉंटेस्ट अशा विविध

### गायन, डान्स, ब्यूटी कॉन्टेस्ट स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यापैकी गाण्याच्या स्पर्धेत २१ महिलांनी सहभाग घेतला. यामध्ये प्रथम क्रमांक मुगधा पेंडसे, द्वितीय क्रमांक रेखा चौधरी, तृतीय क्रमांक विदुला पित्रे तर उत्तेजनार्थ प्रतिभा मानकामे व राधिका ठक्कर या विजयी झाल्या.

सोलो डान्समध्ये ९ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये प्रथम क्रमांक श्वेला अहिर, द्वितीय क्रमांक सोनम पिंगळे, तृतीय क्रमांक पूजा गडद ह्यांना देण्यात आला.

ग्रुप डान्स स्पर्धेत ६ महिला गृपने सहभाग घेतला होता. त्यामध्ये नारायणी ग्रुपला प्रथम तर एंजल ग्रुपला द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच सौंदर्य स्पर्धेत प्रथम क्रमांक श्वेला अहिर, द्वितीय क्रमांक नेहा शिर्के तरतृतीय क्रमांक पल्लवी म्हात्रे यांना देण्यात आले

सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व ट्रॉफी देण्यात आली. यावेळी २२ महिलांनी विविध प्रकारचे खाण्याचे व इतर वस्तूंचे स्टॉल लावले होते व त्यालाही भरपूर प्रतिसाद मिळाला. तसेच या वेळी अल्प दरात थायरॉईड चेकिंगचा प्रोजेक्टही घेण्यात आला.

# हिरवळ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची मुद्रा संग्रहालयाला भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये प्राचीन काळापासून चालत आलेल्या विविध मुद्रांबद्दल जनजागृती करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना शेअर बाजारात ट्रेडिंग कशा पद्धतीने केली जाते याची ओळख करून देण्यासाठी महाविद्यालयातर्फे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुद्रा संग्रहालय या ठिकाणी औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुद्रा संग्रहालयामुळे आपल्या भारतीय व आंतरराष्ट्रीय बाजारात प्राचीन काळापासून उपयोगात आलेल्या विविध मुद्रांची, चलनाची ओळख झाली.



बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथील भेटीमुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजारात केली जाणारी ट्रेडिंग व ट्रेडिंग करण्यासाठी कशा पद्धतीने पोर्टफोलिओ बनवावे, लॉंग-टर्म बचत कशी व कुठे करावी, बचत करताना योग्य कंपनी कशी ओळखावी तसेच बचत करण्याची योग्य वेळ कशी ओळखावी आणि म्युच्युअल फंडमध्ये बचत कशी करावी व त्याचे फायदे याबद्द्ल मार्गदर्शन करण्यात आले.

औद्योगिक भेटी विद्यार्थ्यांना योग्य व्यवसाय निवडण्यात मदत करतात. औद्योगिक भेटीचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना व्यवसाय आतून कसे चालतात याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे आहे असे मत हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर भाई धारिया संचालिका सोनाली धारिया यांचे आहे.

अनेक उद्योगांमध्ये विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण कार्यात्मक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध ठिकाणी औद्योगिक भेटीचे आयोजन केले जाते.

महाविद्यालयाचे तीन प्राध्यापक ज्योती पुजारी, राकेश वडवळकर, कोमल गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुद्रा संग्रहालयाला औद्योगिक भेट दिली.

# पेणमध्ये साडेसहा लाखांची फसवणूक

**पेण : प्रतिनिधी**




पेणमध्ये शिवणक्लास व ब्युटी पार्लरचे कोर्सेस करीता निधी मिळवून देण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांची ६ लाख ४० हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी कि, फिर्यादी रा. बोवे पो.शिर्की ता.पेण यांची पत्नी हीचा विश्वास संपादन करून शिवणक्लास व ब्यूटी पार्लरचे कोर्सेस करीता शासकिय निधीतून पैसे मिळतील असे आमिष दाखवून ३ मार्च २०२१ ते १७ मार्च २०२३ पर्यंत फिर्यादी याचे पत्नीकडून पेण नगरपालीका येथे आरोपी क्रमांक १ व २ यांनी आपआपसात संगनमत करुन २ लाख रूपये घेतले तसेच आरोपीत क्रमांक १ यांनी आरोपीत क्रमांक २ यांच्याशी ओळख करून देवून ते सूध्दा कोर्सेसच्या मार्फत फायदा मिळवून देतील असे सांगून त्याच्याकडेही ४ लाख ४० हजार रुपये फिर्यादी यांनी देवून त्या बदल्यात कोणताही फायदा न मिळवून देता फिर्यादी यांची ६ लाख ४० हजार रुपये रकमेची फसवणूक केली.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. ७२/२०२३ भा. दं. वि. कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतिक पोकळे करीत आहेत.

# जनजागृती ग्राहक मंच पेण शाखेतर्फे ग्राहक दिन साजरा




**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरात महात्मा गांधी मंदिर व वाचनालय पेण येथे १५ रोजी जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त जन जागृती ग्राहक मंच रायगड पेण शाखा व मुंबई ग्राहक पंचायत पेण याच्यां सयुंक्त विद्यमाने ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रास्ताविकात पेण शाखेचे अध्यक्ष चंद्रशेखर मेहेर यांनी पेण शाखेने अतापर्यंत केलेले कामाची सविस्तर माहिती दिली.

निवासी तहसिलदार प्रसाद कालेकर यांनी सेतू सेवा, बॉण्ड पेपर व शिधा वितरण शासकीय कामाच्या वेगवेगळ्या योजना इत्यादी विषयी माहिती सांगितली. यांनी मुंबई ग्राहक पंचायत वितरण उपस्थितांना केले. मुंबई ग्राहक पंचायतचे शिक्षण विभाग प्रमुख श्रीमती सौ मंगला गाडगीळ यांनी ग्राहकांचे हक्क व कर्तव्ये या विषयावर सुंदर व महत्वपूर्ण माहीती ग्राहकांना दिली. तसेच यावेळी मान्यवरांनी ग्राहकांनी विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर पण वेगवेगळी उदाहरण देऊन पटवून सांगितले. तसेच मुंबई ग्राहक पंचायतचे शिक्षण विभागाचे समन्वयक श्रीमती सौ.अंजली पोतदार यांची मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास गणेश जोशी, बाळकृष्ण कमळकर, सतीश मदाने व पेण शाखेचे इतर पदाधिकारी तसेच ग्राहक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव डॉ.देवीदास बामणे यांनी केले. शेवटी अभय जोशी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# लोणशी येथील तरुणाचा आकस्मिक मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणशी येथील एका ४० वर्षीय तरुणाचा आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. याबाबतची माहिती दिनेश महीपत केकाणे (वय-४२) रा. लोणशी ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, घटनेची माहिती देणारे दिनेश महीपत केकाणे व म मृत रुपेश बाळाराम केकाणे (वय-४०) रा. लोणशी ता. माणगाव हे वणवा विझविण्यासाठी गेले असता माहिती देणार यांचा चुलत भाऊ मयत रुपेश बाळाराम केकाणे हा घरी पोहचला नाही असे त्यांच्या वडिलांनी सांगितले. म्हणून याबाबत माहिती देणारे दिनेश महीपत केकाणे व मृत रुपेश यांचे वडील बाळाराम केकाणे हे वणवा लागलेल्या ठिकाणी रुपेशला पाहण्यास गेले. त्यावेळी वनव्यापासून जवळच पाण्याच्या ओहोळाजवळ रुपेश बाळाराम केकाणे हा बेशुद्ध अवस्थेत पडलेला दिसला. तसेच त्याचा डावा पाय भाजलेला दिसला. म्हणून खबर देणारे दिनेश महीपत केकाणे यांनी रुपेशला त्याच्या वडिलांसह उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे आणले. याठिकाणी रुपेशला आणल्यावर येथील डॉक्टरांनी त्यास तपासून मयत झाल्याचे सांगितले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू रजि. नं. १३/२०२३ सीआरपीसी १७४ प्रमाणे दाखल करण्यात आली आहे.

ढघटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. गायकवाड करीत आहेत.

# भाजप अनुसूचित जाती मोर्चाची बैठक

## कर्जत येथे विविध विषयांवर चर्चा



**कर्जत : प्रतिनिधी**

भाजपच्या अनुसूचित जाती मोर्चा, कर्जत मंडलाची बैठक शुक्रवारी (दि. १७) दुपारी १-०० वाजता, भाजपा मध्यवर्ती कार्यालयात उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मा. नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्यांनी बैठकीला मार्गदर्शन करताना पक्षाने मागासवर्गियांसाठी केलेल्या विधायक कार्याची, योजनांची माहिती देवून पक्षवाढीस झटून समाजाचा उत्कर्ष केला पाहिजे,असे आवाहन केले.

तसेच बुथ विस्तारक अभियानाविषयी माहिती देवून उपस्थितांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. या बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष अरुण सोळंकी, सरचिटणीस अमित जाधव, पनवेल शहराध्यक्ष श्याम साळवी, चिटणीस अमोल जाधव, स्थानिक पदाधिकारी वसंत जाधव, रविंद्र जाधव, अनिल रोकडे, मंदा डोले, मुक्ता जाधव आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात समाधानकारक जलसाठा

## उसरण धरणात ८४ टक्के पाणी

**रोहे : प्रतिनिधी**

मार्चचा महिना मध्यंतराला आला असून पावसाळा सुरू होण्यास अद्याप किमान अडीच महिने शिल्लक आहेत. मार्च महिन्याच्या मध्यंतराला रायगड पाटबंधारे विभाग अंतर्गत येत असलेल्या २८ धरणातील पाणीसाठा पाहिल्यास श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरण क्षेत्रात सर्वात कमी २१ टक्के पाणीसाठा आहे. पनवेल तालुक्यातील उसरण धरण क्षेत्रात सर्वात जास्त ८४ टक्के पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील २८ धरणा पैकी अद्याप २० धरण क्षेत्रात ५० टक्के पेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे रानीवली धरणाचा अपवाद वगळता अन्य धरणात समाधानकारक साठा आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्राच्या पाणीसाठा पाहता मुरुड तालुक्यातील फणसाड धरण क्षेत्रात ४२ टक्के पाणीसाठा, तळा तालुक्यातील वावा धरण क्षेत्रात ७१ टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरण क्षेत्रात ७६ टक्के, पेण तालुक्यातील आंबेघर धरण क्षेत्रात ८२ टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरण क्षेत्रात ४६ टक्के, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरण क्षेत्रात ५८ टक्के, घोटवडेत ५९ टक्के, ढोकशेत धरणात ५३ टक्के, कवेळेत ५६ टक्के, उन्हेरे धरण क्षेत्रात ७० टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरण क्षेत्रात ४६ टक्के, कुडकीत ५५ टक्के, रानीवली धरण क्षेत्रात २१ टक्के, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरण क्षेत्रात ८३ टक्के, संदेरी धरण क्षेत्रात ७७ टक्के, महाड तालुक्यातील वरंध धरण क्षेत्रात ६० टक्के, खिंडवाडी धरण क्षेत्रात ६८ टक्के, कोथुर्डे धरण क्षेत्रात ६८ टक्के पाणीसाठा, खैरे धरण क्षेत्रात ४८ टक्के पाणीसाठा, कर्जत तालुक्यातील साळोख धरण क्षेत्रात ५८ टक्के पाणीसाठा, अवसरे धरण क्षेत्रात ४१ टक्के पाणीसाठा, खालापूर तालुक्यातील भिलवले धरण क्षेत्रात ६० टक्के पाणीसाठा, कलोते मोकाशी धरण क्षेत्रात ७० टक्के पाणीसाठा, डोणवत धरण क्षेत्रात ४४ टक्के पाणीसाठा पनवेल तालुक्यातील मोरबे धरण क्षेत्रात ६९ टक्के पाणीसाठा, बामणोली धरण क्षेत्रात ५९ टक्के पाणीसाठा, उसरण धरण क्षेत्रात ८४ टक्के पाणीसाठा, उरण तालुक्यातील पुनाडे धरण क्षेत्रात ४८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, श्री.विनोद किसन पाटील, रा.घोटगाव, ता.पनवेल, जि.रायगड यांचे विक्रम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१, शॉप नं.०९, सेक्टर १०, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड या गाळ्याचे ओरिजनल पेपर पावती नं.१२५४ दि.०८/०२/२०१३, पवल ४-१२४३/२०१३ दि.०८/०२/२०१३ असे घोटगाव ते पनवेल असा दि.१५/०३/२०२३ रोजी रिक्षाने प्रवास करीत असताना कुठेतरी पडून गहाळ झाले असून त्या संदर्भात तळोजा पोलीस ठाणे मध्ये हरविलेल्या मालमत्तेच्या नं.०२२९/२०२३ दि.१८/०३/२०२३ अन्वये नोंद केलेली आहे.

तरी वरील गाळ्याचे ओरिजनल कागदपत्रे कोणाला आढळल्यास खालील नमूद पत्यावर किंवा मोबाईल नंबर अथवा तळोजा पोलीस ठाणे येथे १५ दिवसात आणून द्यावीत.

स्थळ : पनवेल
दिनांक : १८/०३/२०२३

**सही/-**
**विनोद किसन पाटील**
**रा.घोटगाव, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८३३३०९९९९**



अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात**

दि. चौ. अर्ज क्र २३४/२०२३
नि. ८/ड
ने.ता. - -

श्री. तुषार अविनाश सावंत, व इतर १ ..... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही .......... जाबदार

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, कै. अविनाश काशिनाथ सावंत, रा. बी/३, मधुशिल्प, मानपाडा रोड,टेलिफोन ऑफीस समोर, गोखले वाडी, डोंबिवली, (पु)- ४२१२०१ यांचे २५/१२/२०१७ रोजी ज्युपिटर लाईफलाईन हॉस्पिटल, लि, ठाणे (Jupiter Lifeline Hospital LTD Thane) येथे मयत झाले आणि अर्जदार श्री. तुषार अविनाश सावंत, व इतर १ रा. बी / ३, मधुशिल्प, मानपाडा रोड, टेलिफोन ऑफीस समोर, गोखले वाडी,डोंबिवली, (पु)- ४२१२०१ **यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.**

**मिळकतीचे वर्णन**

| अनु क्रं. | मिळकत |
|---|---|
| १ | पी एल-६-अे ६- १३, सेक्टर नं. १, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड |
| २ | मौजे दापोली, ता. दापोली, जि. रत्नागिरी खाते क्र. २२३, भूमापन क्र. ८८ ब १० (बिगर शेती) (Non-Agriculture) |

वरील अर्जदार हे मयत कै. अविनाश काशिनाथ सावंत यांचे वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे कै. अविनाश काशिनाथ सावंत यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल**

# गृहस्वप्न उद्ध्वस्त करणारा जेरबंद

## पनवेल महसूल विभागाच्या आदेशाने बिल्डरची कारागृहात रवानगी



### तब्बल २५० ग्राहकांची फसवणूक

खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर जामिनावर सुटलेल्या शरद मोझर यांनी ग्राहकांना फसवणूकीचे कृत्य सुरूच ठेवले. दरम्यानच्या काळात स्वताच्या मालकीच्या मालमत्ता विक्री केल्या, आणि काही जागांवर चाळी उभ्या करून केवळ नोटरी करून ८ ते १० लाख रूपये घेवून विक्री केल्या. त्यामुळे मोझर यांनी फसवलेल्या ग्राहकांचा आकडा २५० पेक्षा मोठा आहे.

**खारघर : प्रतिनिधी, पनवेल : वार्ताहर**

सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाची थेट कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. स्वप्नपूर्ती होम्स प्रायव्हेट लिमिटेड या वादग्रस्त कंपनीचा संचालक शरद अमृक मोझर याला प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय तळेकर यांच्या आदेशाने थेट कारागृहात पाठविण्यात आले आहे.

लिलावात काढलेली मालमत्ता विक्री न झाल्यामुळे पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी हा निर्णय घेतला. पनवेलमध्ये असे फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याने हा फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना मोठा झटका मानला जात आहे. सर्वसामान्यांची फसवणुक कराल तर कारागृहात जाल असाच इशारा प्रांत अधिकारी राहुल मुंडके आणि तहसीलदार विजय तळेकर यांनी या माध्यमातुन दिला आहे. पनवेल तालुक्यातील विहिघर, नेरे, हरिग्राम आदी भागात गृहप्रकल्प उभे रहात असल्याचे भासवून स्वप्नपुर्ती होम्स या विकसक कंपनीने २०१६ साली सुमारे २५० ग्राहकांची सहा ते सात कोटींची फसवणूक केली होती.

घर बुक करणाऱ्या ग्राहकांकडून घराच्या किंमतीच्या २० टक्के रक्कम जमा करून प्रत्यक्षात गृहप्रकल्पाचे काम पुर्ण केले गेले नाही. घर बुकींगसाठी गुंतवलेली रक्कम परत मागणाऱ्या ग्राहकांना पैसे परत न केल्यामुळे ग्राहकांना खांदेश्वर पोलीस ठाण्यात २०१६ साली विकसकाविरोधात गुन्हे दाखल केले होते. फसवणूक झालेल्या ग्राहकांनी केलेल्या तक्रारीनूसार रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने दिलेल्या आदेशाने संबंधित विकसक शरद अमृत मोझर यांच्याकडून रक्कम वसुल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून देण्यात आले होते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदीप्रमाणे तहसीलदार विजय तळेकर यांनी विकसक मोझरच्या नेरे, हरिग्राम, विहीघर स्थावर मालमत्ता जप्त करून त्यांचा लिलाव लावण्यात आला होता, परंतु लिलावात भाग घेण्याकरीता कोणीही खरेदादार न आल्याने नियमाप्रमाणे मालमत्तेची महसूल विभागाकडून एक रुपया बोली मिळकत सरकारी दरबारी जमा करण्यात आली.

रायगड जिल्हाधिकारी आणि पनवेलचे प्रांतअधिकारी राहूल मुंडके यांच्या मार्गदर्शनानुसार शरद अमृत मोझर याला १० दिवसांचा कारागृह किंवा फसवणूक केलेली सात ते आठ कोटी रूपयांची मिळकत जमा होईपर्यंत जेरबंद ठेवण्यात यावे असे आदेश दिले. त्यानुसार दोन दिवसांपुर्वी खांदेश्वर पोलिसांनी मोझर याला अटक करून तळोजा मध्यवर्ती कारागृह रवानगी करण्यात आली.

दरम्यान, अशा प्रकारे नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# वृद्ध महिलांचे दागिने लांबविणारा ताब्यात; लाखोंचा मुद्देमाल जप्त



**पनवेल : वार्ताहर**

वयोवृध्द महिलांचा पाठलाग करून चैन जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास मुंब्रा पोलिसांनी अटक करून त्याच्या कडून २,५१,१४८ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मुंब्रा पोलीस ठाणे हददीतील दिवा शहर परिसरात वयोवृध्द महिलांना टार्गेट करून त्यांचा पाठलाग करून या महिला राहत्या इमारतीमध्ये जिन्याने घरी जात असताना अनोळखी व्यक्ती हा त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचून पळून जात होता. अशाप्रकारचे १० ते १२ दिवसांमध्ये चार चोरीच्या घटना घडल्याने या गुन्हेगारास अटक करून चैन स्नॅचिंग गुन्हयांना प्रतिबंध करणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान मुंब्रा पोलिसांसमोर होते. वयस्कर महिलांना टार्गेट करून त्यांचे दागिने चोरी होत असल्यामुळे जनमानसामध्ये गुन्हेगारास पकडून घडणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याची मागणी होत होती.


यानुसार मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन. बी. कोल्हटकर यांनी गुन्हयांच्या घटनास्थळी भेट देवून सदर गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मुंब्रा व दिवा गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि शेळके, बोरसे व अमंलदार यांची दोन पथके तयार करून गुन्हेगाराची गुन्हे करण्याची पध्दत, गुन्हे करण्यासाठी वापरलेले वाहन तसेच इतर तांत्रिक व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपी निष्पन्न करून त्यास अटक करणेबाबत वेळोवेळी मार्गदर्शन व पाठपुरावा केला. या पथकांनी चार चैन जबरी चोरीचे गंभीर गुन्हे उघडकीस आणण्याकरिता दिवा, खर्डीगाव, मुंब्रा व शिळफाटा परिसरातील सुमारे ११० खाजगी व महानगरपालिकेचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज संकलन केले.

सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने निरीक्षण करून आरोपीने गुन्हयात वापरलेली मोटारसायकल व त्याचा जाण्या-येण्याचा मार्ग निष्पन्न केला. हा आरोपी गुन्हे करून खर्डी गाव परीसरात जात असल्याचे आढळून आल्याने नमुद पथकांनी अहोरात्र सापळा लावून आरोपीस निर्मलनगरी खर्डी गाव येथून शिताफीने पाठलाग करून ताब्यात घेतले. कमलेश रामानंद गुप्ता (वय ३३ वर्षे) असून तो एक ओला चालक आहे. त्याला पोलिसांनी अटक केली.

पोलीस कोठडी दरम्यान आरोपीकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामध्ये त्याने ठाणे पोलीस आयुक्तालयातील चैन जबरी चोरीचे चार गुन्हे व चोरीचे दोन गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून, गुन्ह्यातील १,९१,१४८ रुपये किंमतींचा ६१ ग्रॅम सोन्याचे दागिने व जबरी चोरीचे गुन्हे करण्याकरीता त्याने नौपाडा हद्दीतून चोरी केलेली ६० हजार रुपये किमतीची मोटरसायकल असा एकुण २,५१,१४८ रुपये किमतीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन. बी कोल्हटकर, पोलीस निरीक्षक संजय पवार, बाबासाहेब निकम, सहायक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके, कृपाली बोरसे, संतोष उगलमुगले, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र किंगरे पोलीस अमंलदार सुभाष मोरे, जयेश तामोरे, योगेश पाटील, किशोर वैरागकर, निलेश लोंढे, प्रमोद शिंदे, उमाकांत गायकवाड, प्रमोद जमदाडे व अजीत येळे यांनी केली आहे. पुढील तपास सपोनि शेळके करत आहेत.

# आरटीई प्रवेश : २२०० जागांसाठी तब्बल २५ हजार अर्ज




**खारघर : प्रतिनिधी**

राज्यात विशेषतः खासगी शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. यामध्ये नवोदित विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा रिक्त असल्याने या प्रवेशासाठी पनवेलमध्ये अर्जाचा पाऊस पडल्याचे पहावयास मिळत आहे. २२०० जागांसाठी शिक्षण विभागाला तब्बल २५ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत.

सध्याच्या घडीला शिक्षण महागले आहे. सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेर गेलेले शिक्षण मोफत स्वरूपात मिळत असल्याने प्रत्येक पालकाला आरटीई अंतर्गत आपल्या पल्ल्याला प्रवेश हव आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या प्रक्रियेतील लाभार्थी प्रवेश घेत असतात. पनवेलमध्ये ११० शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश मिळणार आहे. प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असुन याकरिता २५ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या प्रक्रियेत महत्वाचा म्हणजे निवासी पुरावा हा महत्वाचा मानला जातो. याव्यतिरिक्त जन्माचा दाखला, आर्थिक दुर्बल असल्यास उत्पन्नाचा दाखला(एक लाखापेक्षा कमी उत्पन्न), दिव्यांग असल्यास दिव्यांग पुरावा, जातीचा दाखला आदी कागदपत्र महत्वाचे आहेत.

शिक्षणाचा अधिकार सर्व वर्गांना समान बनवण्यासाठी भारतीय राज्यघटनेत 'शिक्षणाचा अधिकार' (आरटीई) ला वेगळी जागा दिली गेली आहे. जेणेकरून देशातील कोणताही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये. आरटीई प्रवेश घेण्यासाठी शाळेकडून प्रवेशाचा दिनांक अर्जात नमूद केलेल्या मोबाइलवर एसएमएसद्वारा कळविण्यात येतो. परंतु पालकांनी एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई पोर्टल वरील Application Wise Details (अर्जाची स्थिती) या tab वर क्लिक करून प्रवेशाचा दिनांक पाहावा. प्रवेशाकरिता एसएमएसद्वारा सूचना प्राप्त झाल्यानंतरच शाळेत जावे. मुदतवाढ मिळाल्याने अर्जाची संख्या वाढण्याचीही शक्यता आहे.

> **१७ मार्च तारीख अर्ज भरण्याची अंतिम तारीख होती. त्याला २५ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आजपर्यंत २५ हजार अर्ज आम्हाला प्राप्त झाले आहेत.**
> **-एस. आर. मोहिते, वरिष्ठ विस्तार अधिकारी, शिक्षण विभाग, पनवेल**

# सुरक्षा सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांना प्रतिसाद




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा हद्दीच्या क्षेत्रातील सिप्ला कंपनी सुरक्षा सप्ताह २०२३ साजरा करण्यात आला. या सुरक्षा सप्ताहात कंपनीतील सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात.

येथील कामगारांना सुरक्षिततेचे महत्त्व यावेळेस पटवून देण्यात येते. काम करत असताना कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये याची काळजी घेतली जाते. कंपनीत विविध कामे करणारे छोटे-मोठे उद्योजक यांनाही या वेळी सुरक्षिततेचे नियम सांगून पुरस्कार देण्यात येते. रसायनी येथील उद्योजक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गायकवाड यांच्या प्रकाश इंजिनिअरींग वर्क्स यांना सुरक्षा ऑफीसरद्वारे सेफ्टी अवॉर्ड ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले.

या वेळी कंपनीचे सुरक्षा अधिकाऱ्यांसह ज्येष्ठ समाजसेवक प्रकाशशेठ गायकवाड, साईड इन्चार्ज प्रमोद पाटील, रमेश वाघमारे, किरण म्हात्रे, केशव शेलार, भरत पाटील, रूपेश पडवळ आदी प्रकाश इंजिनिअरींग वर्क्सचे कर्मचारी उपस्थित होते. प्रकाश इंजिनिअरींग वर्क्सला सुरक्षिततेबाबत सेफ्टी अवॉर्ड मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दरम्यान, सिप्ला कंपनीतर्फे अनेक सामाजिक उपक्रम तसेच सन्मान सोहळे आयोजित करण्यात येत असतात.

# उरण-पनवेल मार्ग उद्यापासून दुरुस्तीसाठी बंद




**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरण-पनवेल हा रस्ता प्रवाशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असून दररोज हजारो प्रवाशी या मार्गांवरून प्रवास करतात, मात्र उरण येथील उरण-पनवेल मार्गावरील दोन साकवच्या दुरुस्तीसाठी सोमवार (दि. २०)पासून हा मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंदर्भात सूचना फलक बसविले आहेत. त्यानुसार उरण-पनवेल मार्गावरील उरण रेल्वे स्थानक व आनंदी हॉटेलजवळील दोन साकव (मोऱ्या) नादुरुस्त झाल्या आहेत. त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात येणार आहे. या कामासाठी सोमवापासून उरण-पनवेल मार्गावरील बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण कोटनाका (राघोबा मंदिर) हा मार्ग वाहनांसाठी बंद करण्यात येणार आहे. प्रवाशी वर्गांचे प्रवासात होणारे हाल, जनतेच्या मागणीचा विचार करून व भविष्यातील होणारे अपघात टाळण्यासाठी पूल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्याचे समजते.

### असा असेल पर्यायी मार्ग

उरण-पनवेल हा महत्वाचा मार्ग वाहतुकीसाठी बंद केल्याने उरण शहरात व शहरातून ये-जा करण्यासाठी नागरिकांनी नवीन शेवा-उरण चारफाटा मार्गाचा पर्यायी मार्ग म्हणून वापर करण्याची सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आहे.

# कलिंगडची मागणी वाढल्याने दरवाढ


(संग्रहित छायाचित्र)

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उन्हाचा जोर वाढत असताना वाशीच्या मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारात रसरशीत लाल रंगाचे कलिंगड मोठ्या प्रमाणात दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. शरीराला थंडावा देणारी कलिंगडे बाजारात मुबलक उपलब्ध झाली असून, चव चाखण्यासाठी मागणीही वाढत आहे. त्यामुळे घाऊक बाजारत दरवाढ झाली असून, किरकोळ बाजारात तर भरपूर दरवाढ केली जात आहे.

घाऊक बाजारात ४०-५० गाड्या अशी नऊ हजार ३२० क्विंटल कलिंगडची आवक झाली असून, प्रतिकिलो १० रुपये ते १५ रुपये, तर किरकोळ बाजारात प्रतिनग ७० रुपये ते १०० रुपये बाजारभाव आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच आंब्यापाठोपाठ फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात फळ बाजारात कलिंगडे दाखल होण्यास सुरुवात होते. तर मार्चपासून त्याच्या मागणीत वाढ होते. महाराष्ट्रसह तमिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक येथून त्याची आवक होते. सध्या बाजारात शुगरबेबी आणि नामधारी कलिंगड उपलब्ध आहेत.

आधी घाऊक बाजारात कलिंगड प्रतिकिलो ८-१० रुपयांनी उपलब्ध होते, परंतु मागणी वाढत असल्याने दरवाढ होत आहे. रमजाननंतर रसाळ फळांची मागणी आणखी वाढणार असून त्यामुळे पुन्हा दर वाढण्याची शक्यता आहे, असे मत व्यापारी संजय पिंपळे यांनी व्यक्त केले.

### खरबूजची आवकही वाढली

उन्हाळी वातावरणात खरबूजलाही अधिक मागणी असते. विशेषतः



फळ सलादमध्ये कलिंगड व खरबूज हे जास्त प्रमाणात वापरले जातात. एपीएमसी बाजारात दक्षिण सोलापूर, तमिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश येथून २ हजार क्विंटल आवक झाली आहे. घाऊक बाजारात खरबूज प्रतिकिलो २०-२५ रुपये बाजारभावाने विक्री होत आहे. तसेच १ हजार ६२५ किलो पपई आवक झाली असून १५-३० किलो दराने विक्री होत आहे.

# न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी संजीव धुमाळ

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी संजीव धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच पदभारही स्वीकारला आहे.

उरणमधील शासकीय अधिकाऱ्यांचे बदली सत्र सुरू आहे. त्यामध्ये उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील, न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर भटे यानंतर उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांचीही उरणहून बदली झाली आहे. न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर भटे यांची बदली झाल्याने त्या जागी संजीव धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# मदर्स टच प्ले ग्रुप आणि नर्सरी स्कूलचे स्नेहसंमेलन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर २मधील कर्नाटक हॉलमध्ये मदर्स टच प्ले ग्रुप आणि नर्सरी स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि. १७) मोठ्या उत्साहात झाला.

या स्नेहसंमेलनाला शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. पुष्पा तिवारी, भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र राज्य उत्तर प्रदेश सेलच्या महिला सचिव अ‍ॅड. बिंदू दुबे, पंतजली योगाचे आर. पी. यादव, पनवेल गुरुद्वाराचे कुलभीर सिंग, योग शिक्षिका डॉ. स्वरांजली गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या प्रेमा भोपी, भारती मिश्रा, अर्चना मुझुमदार, पत्रकार मिलिंद खारपाटील यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि श्री गणेशमूर्तीस पुष्पहार अर्पण करून झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी धार्मिक, देशभक्ती अशा विविध गाण्यांवर नृत्य केले. याचबरोबर सध्या आवश्यक असलेल्या प्लॅस्टिक मुक्तीचा संदेश गाण्याबरोबर देण्यात आला. अ‍ॅड. बिंदू दुबे म्हणाल्या की मुले ही देशाचे भविष्य आहेत. आणि या शाळेत मुलांना अतिशय चांगले शिक्षण आणि संस्कार देण्याचे काम शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा तिवारी आणि त्यांच्या सहकारी करत आहेत हे निश्चितच अभिनंदनीय आहे.

डॉ. स्वरांजली गायकवाड म्हणाल्या की, जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याचबरोबर योग्य आहार घेणे देखील अत्यावश्यक आहे. महिला पालकांनी वेगवेगळे ड्रेस परिधान करून फॅशन शोच्या माध्यमातून देशाची विविधता दर्शविली. उपस्थित मान्यवरांना २४ तास ऑक्सिजन देणारे तुळशीचे रोपटे देऊन त्या माध्यमातून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला. सायंकाळी ६ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री १० वाजेपर्यंत रंगला. शाळेतील शिक्षिका गौरी सातपुते, मनिषा जगताप, रेणू घावर, विद्यार्थी आणि पालक यांच्या सहकार्याने हे स्नेहसंमेलन यशस्वी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यपिका डॉ. पुष्पा तिवारी यांनी केले.

# वणव्यामुळे बागायतदारांचे लाखोंचे नुकसान

## मुरुड तालुक्यातील स्थिती : पंचनामे करण्याची ग्रामस्थांची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील बेलीवाडी, सुमरादेवी, मणेरपाडा, वडघर, आदाड तसेच परिसरातील जंगल भागात वणवा लागून हजारो एकर जमिनीवरील झाडांचे व पशुपक्षी, प्राणी, असंख्य वनौषधी वनस्पती आगीत जळून खाक झाल्या आहेत. मागील काही दिवसापासून या भागातील गावात वणवे लागल्याने आंबा बागायतीचे पीक जळून गेल्याने आंबा बगयतदार यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.



वणवा कोणी खाजगी मालमत्तेत साफसफाई करण्याकरीता आग लावतो व निघून जातो. आग आटोक्यात येईपर्यंत ते थांबत नहीत. संबंधित व्यक्ती उपस्थित न राहिल्याने तीच आग लगतच्या क्षेत्रात पसरून वणवे लागत आहेत. दुसरे कारण असे निदर्शनास येत आहे कि, रस्त्यावरुन रहदारी करणारे काही लोक शिगारेट ओढतात. शिगारेट ओढून झाल्यावर रस्त्याच्या कडेला जावून पडते. तीथे असणारे सुके गवत पेट घेऊन हा जिवघेणा प्रकार घडतो. वणव्यामुळे निसर्ग संपदा नष्ट होत आहे आणी निसर्गाचा समतोल सुद्धा बिघडत आहे. फणसाड अभयारण्य क्षेत्राकडे वणवे विझवण्यासाठी खास टीम दिसून येते परंतु प्रादेशिक विभागाकडे अशी टीम नियुक्त न केल्याने प्रत्यक्षात ज्यावेळी वणवा लागतो त्यावेळी प्रादेशिकचे वन कर्मचारी उशिरा पोहचणे आग विझवण्यासाठी पुरेसे साहित्य नसणे यामुळे ही आग पसरुन खूप मोठे नुकसान होत आहे.

दरवर्षी मुरुड तालुक्यातील भागात वणवे लागत असतात यासाठी राज्य शासनाकडून वन विभागाला सुद्धा फायर ब्रिगेडची गाडी देणे खूप आवश्यक आहे.

या लागणाऱ्या वणव्यामुळे मुरुड तालुक्यातील शेकडो एकरातील हापूस आबांच्या बागा आलेल्या फळपिकासकट जळून खाक झाल्या आहेत. मुरुड तालुक्यातील गावांमध्ये लागणाऱ्या वणव्यांमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात यावेत अशी मागणी येथील ग्रामस्थ करीत आहेत. याबाबत मुरुड वनखाते येथे शेतकरी अ‍ॅड. विनायक शेडगे यांनी निवेदन देऊन वणव्यांमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी केली आहे.

वणवे लागल्यावर वन खाते यांनी प्रभावी यंत्रणा उभी केली पाहिजे. तेच कर्मचारी उशिरा पोहचल्याने आग सर्वत्र पसरून तिची व्याप्ती वाढत आहे. दरवर्षी वणवे लागत असतील तर जंगल भागाच्या शेजारी राहणाऱ्या लोकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. वणवे न लागण्यासाठी वनखाते यांनी प्रभावी यंत्रणा राबवावी, अशी मागणी मुरुड तालुक्यातील ग्रासमथांकडून होत आहे.

याबाबत अ‍ॅड. विनायक शेडगे यांनी वणव्यांमुळे गावांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. लोकांच्या आंब्याच्या बागा सुद्धा जाळून खाक झाल्या आहेत. प्रत्येक आंब्याच्या झाडाला दहा हजार रुपये नुकसान भरपाई राज्य शासनाकडून मिळण्यासाठी वनखाते यांनी तात्काळ जळालेल्या बागेचे पंचनामे करून गरीब बागायतदाराना दिलासा द्यावा. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून शेतकरी जगला तरच सर्व जगणार आहेत. तसेच वणवा लागताच वन खात्याने प्रभावी यंत्रणा व अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणावी जेणेकरून त्वरित आग विझवणे शक्य होणार आहे. राज्य शासनाने वणव्यांमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून येथील गरीब शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

> **वणवे लागू नये यासाठी वन विभागाने निष्ठेने काम केले पाहिजे. मागील काही दिवसापूर्वी लागलेल्या वणव्यांमुळे आंबा बागायत जमिनीतील अनेक झाडे जळून खाक झाली आहेत. त्या झाडांचे पंचनामे करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरपाई वनखात्यानी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.**
>
> **–मनीष नांदगावकर, सरपंच, उसरोली**

# अवकाळी पावसामुळे रानमेवा संकटात

**खोपोली : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने तालुक्याच्या ठीकाणी हजेरी लावली असल्यामुळे रस्ते जलमय झाले होते. तर हिवाळा हा ऋतू संपून उन्हाळा ऋतूची चाहूल लागताच जंगलातील रानमेवा तयार होत असताना या अवकाळी पावसाचा फटका अदिवासी समाजाला बसला आहे. याच रानमेवावर अदिवासी समाजाच्या उपजिविकेचे साधन निर्माण झाले होते. मात्र अवकाळी पावसामुळे त्यांच्या उपजिविकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

तसेच ग्रामीण भागात शेतातील कडधान्य काढणीला पावसाने अवेळी धिंगाणा घातल्याने मोठे नुकसान झाल्याचे शेतकरी वर्गांकडून व्यक्त होत आहे. आंब्यांची मोठी हानी झाल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. सध्या आंब्यांना छोट्या कैऱ्या लागायला सुरू झाल्यानंतर वादळी वारे आणि या पावसामुळे कैऱ्या खाली पडून खच निर्माण झाले आहेत. त्याच बरोबर जंगलातील तयार होत असलेला रानमेवा मोठ्या संकटात सापडला आहे.



### आदिवासींच्या उपजीविकेवर प्रश्नचिन्ह

डोंगराची असलेली काळी मैना आता तयार होत असल्याने अवकाळी पावसाने आदिवासी उपजिविकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तालुक्यात कुठे रिमझीम झाली तर कुठे मुसळधार पावासाने चांगलेच झोडपले होते. वातावरणात उष्णता खुप वाढली असल्यामुळे उकाड्याची तीव्रता चांगलीच वाढली होती. मात्र अवकाळी पावासाने जरी वातावरणात गारवा निर्माण केला असला तरी सुद्धा शेतकरी चांगलाच धास्तावला आहे. यामुळे तोंडाशी आलेले पिक वाया जाण्यांच्या मार्गावर असताना शेतकरी हवालदिल झाला आहे.

# सुधागड तालुक्यातील देवस्थानच्या जमिनी वाचवण्यासाठी प्रकाश देसाई सरसावले

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घेणार भेट

**पाली : प्रतिनिधी**

देवस्थानच्या जमिनीचे हक्क व संरक्षण कायम अबाधित रहावे यासाठी शासनाचे अधिकृत परिपत्रक जाहीर झालेले असतानादेखील सुधागड तालुक्यात शासकीय व्यवस्थापनाकडून देवस्थानच्या जमिनी मालकी हक्काच्या करून देण्याच्या सपाटा सुरू आहे.

येथील जांभुळपाडा, मानखोरे, ढोकशेत, घोटवडे, आदी गावातील अनादीअनंत काळापासून देवस्थानच्या ताब्यात असलेल्या मिळकती व्यक्तिगत नावाने मालकी हक्क देऊन विकण्याचा धक्कादायक प्रकार सुरू आहे. देवस्थान जमिनीरुपी लोण्याचा गोळा बेकायदेशीररीत्या लाटणाऱ्यांची पोलखोल व्हावी, यावर अंकुश बसावा व शासन परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी आवाज उठवणार असल्याचा इशारा शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिला आहे. या संदर्भात लवकरच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन तक्रारी निवेदन देऊन योग्य ती कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे देसाई यांनी या वेळी स्पष्ट केले.



प्रकाश देसाई यांनी म्हटले की, देवस्थानच्या ताब्यात असलेल्या जमिनीच्या परस्पर विक्रीवर अंकुश असणे गरजेचे आहे. मात्र प्रशासनाला हाताशी धरून शासनाच्या अधिकृत परिपत्रकाला फाटा देऊन प्रशासनाकडूनच बेकायदेशीररित्या परवानग्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप देसाई यांनी केला आहे. एकीकडे कायद्याचा बड़गा दुसरीकडे ज्यांचा देवस्थानच्या ज़मीनीशी काही सबंध नाही अशा लोकांचा कोट्यवधी रुपये किमतीच्या जमिनीवर डोळा असल्याचे देसाई यांनी म्हटले आहे.

अशातच शासनाने बेकायदेशीर रित्या शासकीय परवानग्या देऊन विक्री केलेल्या जमिनी पुनःश्च देवस्थानच्या ताब्यात देऊन त्यातून देवस्थानचा कारभार सुरळीत चालवावा असा शासनाचा निर्णय आहे. असे असतानाही आजही स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून देवस्थानचे नाव रद्द करून जमीन विक्री करण्यासाठी व्यक्तिगत मालकी हक्कात दिल्या जात आहेत. ही बाब गंभीर असुन प्रशासनाकडून शासनाने काढलेल्या शासन परिपत्रकाची पायमल्ली होत असल्याबाबत देसाईंनी संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री व संबंधित विभागाकडे लेखी तक्रार करून यासंदर्भातील परिपत्रकाची प्रभावी व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे देसाई यांनी म्हटले आहे. याबरोबरच आजवर देवस्थानच्या ताब्यातील किती जागा जमिनीची विक्री झाली याचीदेखील सखोल चौकशी व कारवाई व्हावी, अशी मागणीदेखील राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचे देसाई या वेळी म्हणाले.

# चवदार तळे सत्याग्रह दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सशस्त्र मानवंदना द्यावी; 'वंचित बहुजन'ची मागणी

## पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त पोलीस खात्या मार्फत सशस्त्र शासकीय मानवंदना म्हणजे अभिवादन करण्याची मागणी रायगड जिल्हा वंचित बहुजन युवा आघाडीमार्फत करण्यात आली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास वंचितचे जिल्हा युवक अध्यक्ष अमित गायकवाड व पदाधिकारी शनिवार (दि. १८)पासून चवदार तळे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारी आमरण उपोषणाला बसणार आहेत.



या मागणीचे निवेदन जिल्हा वंचित बहुजन युवा आघाडी मार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांना पुन्हा एकदा देण्यात आले आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रचंड उत्साही दिसत आहेत. मात्र मागणी पूर्ण न झाल्यास कार्यकर्ते संतप्त होऊ शकतात. मागील आठवड्यात महाड पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत जिल्हा पोलीस अधीक्षक यांना या मागणीचे विनंती पत्र दिले होते. परंतु याबाबत कोणत्याही स्वरूपाचे उत्तर मिळाले नसल्याने जिल्हा वंचित बहुजन युवा आघाडी मार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांना पुन्हा एकदा विनंती करण्यात आली आहे. या निवेदनात म्हंटले आहे की भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिन हा येत्या २० मार्च २०२३ रोजी महाड चवदार तळे या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. सदर दिनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या पोलीस खात्या मार्फत सशस्त्र मानवंदना देऊन पोलीस खात्यामार्फत अभिवादन करावे मात्र मागणी पूर्ण न झाल्यास मुळे चवदार तळे वर्धापन दिनी जर काही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याला पोलीस प्रशासन जबाबदार असेल. असे देखील निवेदनात म्हंटले आहे. निवेदन देताना वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हा अध्यक्ष अमित गायकवाड, महासचिव वैभव केदारी, सुधागड तालुका महासचिव आनंद जाधव, सुधागड तालुका युवक अध्यक्ष प्रशांत गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# फूड टेक्नॉलॉजीमध्ये कर्जतचा शुभम उगले विद्यापीठात प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचा शुभम शैलेश उगले कॉलेज ऑफ फूड टेक्नॉलॉजी, सरळगाव येथे शिक्षण घेत होता. त्याने बी. टेक (फूड टेक्नॉलॉजी) विद्या शाखेत डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे.



शुभम हा कर्जत शहरातील म्हाडा वसाहतीत राहत असून त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये झाले. त्याला १० वीला ९३ टक्के गुण मिळाले होते. पहिल्यापासूनच हुशार असलेल्या शुभम याला राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती मिळत होती. त्यानंतर त्याने चांदीबाई मनसुखानी महाविद्यालयात १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतले. त्याला बारावीच्या विज्ञान शाखेत ८५ टक्के गुण मिळाले होते. त्यानंतर त्याने कॉलेज ऑफ फूड टेक्नॉलॉजी, सरळगाव–मुरबाड येथे शिक्षण घेतले. त्याने बी. टेक (फूड टेक्नॉलॉजी) विद्या शाखेत डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला. त्याला त्याची आई शीतल, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्रा. रणजीत कोकणी तसेच त्याची बहीण शिवाणी यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या ४१ व्या पदवीदान समारंभात महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते सन्मानपत्र आणि सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले.

# स्व. महेश देशमुख नागरी सहकारी पतसंस्थेला बँको पुरस्कार प्रदान




**अलिबाग : प्रतिनिधी**

बँको संस्थेकडून दिला जाणारा ब्ल्यू रिबन विजेतेपद पुरस्कार अलिबाग येथील स्व. महेश देशमुख नागरी सहकारी पतसंस्थेला महाबळेश्वर येथे प्रदान करण्यात आला. संस्थेचे चेअरमन अ‍ॅड. परेश देशमुख यांनी हा पुरस्कार स्विकारला.

व्यवसाय, प्रतीसेवक उत्पादकता, संगणकीकरण, ऑडीट वर्ग, कर्जवसुली, वार्षिक व्यवसाय वृद्धी, उत्तम व्यवस्थापन आणि प्रशासन या निकषांच्या आधारे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थाना संस्थेकडून बँको पुरस्काराने गौरविण्यात येते.

बँकोचे मुख्य संपादक अविनाश शिंत्रे, संचालक अशोक नाईक तसेच ठाणे जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरद गांगल यांच्या हस्ते बँको पुरस्काराचे वितरण महाबळेश्वर येथील एवरशाईन रिसॉर्ट अँड स्पा येथे करण्यात आले.

यावेळी चेअरमन अ‍ॅड. परेश देशमुख यांच्यासह व्हाईस चेअरमन वैभव पाटील, सेक्रेटरी महेंद्र पाटील, संचालक संदीप घरत, कर्मचारी प्रतिनिधी विनायक गिरकर आदी उपस्थित होते.

पतसंस्थेचे सर्व सभासद, संचालक, ठेविदार, कर्जदार, हितचिंतक यांचे सहकार्य हा मोलाचा वाटा असल्याचे मत चेअरमन अ‍ॅड. परेश देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

# पाणीपट्टी थकबाकीदारांचे धाबे दणाणले

## माणगाव नगरपंचायतीने सदनिकाधारकांचे नळ कनेक्शन तोडण्याचा उचलला बडगा

**माणगाव : प्रतिनिधी**

नागरी सुविधांची नगरपंचायतीकडून अपेक्षा धरणाऱ्या नागरिकांना पाणीपट्टी कर व मालमत्ता कर भरण्यास माणगाव नगरपंचायतीने तगादा लावला आहे. गेली दहा वर्षापासून अनेक बिल्डिंग, कॉम्प्लेक्स मालकांनी पाणीपट्टी कर थकविल्यामुळे माणगाव नगरपंचायतीने या बड्या सदनिका धारकांना त्वरित पाणीपट्टी कर भरावा यासाठी आगाऊ नोटीस दिली होती. मात्र या सदनिका धारकांनी माणगाव नगरपंचायतीच्या नोटीसीची दखल घेतली नसल्याने माणगाव नगरपंचायतीने त्यांचे नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरु केल्याने बड्या सदनिका धारकांचे धाबे दणाणले आहेत. या सदनिका धारकावर नळ कनेक्शन तोडण्याच्या कारवाईची बडगा नगरपंचायतीने उचलल्यामुळे त्यांच्यावर नामुष्कीची वेळ आली आहे.



माणगाव शहरात अनेक मोठ्या सदनिका आहेत. यापैकी बहुतांशी सदनिका धारकांनी गेली दहा वर्षापासून नगरपंचायतीचा पाणीपट्टी कर भरला नसल्याने माणगाव नगरपंचायतीने या सदनिका धारकांना पाणी कनेक्शन तोडण्याबाबत नोटीस दिल्या होत्या. मात्र अनेक सदनिका धारकांनी पाणीपट्टी कर भरण्याकडे पाठ फिरवली. नगरपंचायतीने घालून दिलेल्या मुदतीनंतर ही पाणीपट्टी कर भरला नसल्याने नगरपंचायतीने माणगाव मधील आरोग्य बिल्डिंग दत्तनगर, जालगावकर जुनी चाळ गार्डन जवळ कचेरी रोड, स्काय व्हीव्यू कचेरी रोड, तनजीन कॉम्प्लेक्स जुने माणगाव, पल्लवकर कॉम्प्लेक्स रेल्वे स्टेशन नाणोरे या पाच कॉम्प्लेक्सवर नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरु केली. त्यापैकी आरोग्य बिल्डिंग दत्तनगर या सदनिका धारकांनी पाणीपट्टी कर नगरपंचायतीकडे भरणा केला आहे. उर्वरित सदनिका धारकांनी कर भरला नसल्याने त्यांच्यावर पाणी कनेक्शन तोडण्याची कारवाई नगरपंचायतीने केली आहे.

माणगाव नगरपंचायतीचा चालू पाणीपट्टी कर थकबाकी ७३ लाख ४३ हजार ६३१ रुपये तसेच मागील थकबाकी ६० लाख ९० हजार ३९३ रुपये. असे एकूण १ कोटी ३४ लाख ३४ हजार ५४ रुपये. थकला आहे. सामान्य नागरिक पाणीपट्टी कर थोड्या फार प्रमाणात भरतात. मात्र मोठे सदनिका धारक पाणीपट्टी कर भरीत नाहीत. कांही सदनिकाधारकांकडे नगरपंचायतीची दहा वर्षाची पाणीपट्टी कर थकीत आहे. या सर्वांना नगरपंचायतीची मालमत्ता कर व पाणी कर भरण्याच्या नोटीसा दिल्या आहेत. हा कर न भरणाऱ्यांना नगरपंचायती कडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. तसेच थकबाकीदारांचे सदनिकेसमोर ढोल बजाव आंदोलन नगरपंचायतीकडून केले जाणार आहे. एवढेच नव्हे तर जप्तीच्या नोटीस देवून नगरपंचायत कारवाई करणार आहे.

> **माणगावमधील नागरी सुविधांच्या अपेक्षा धरणाऱ्या सुजाण नागरिकांनी नगरपंचायतीचा पाणीपट्टी कर व मालमत्ता कर वेळीच भरून नगरपंचायतीला सहकार्य करावे.**
>
> **–संतोष माळी, मुख्याधिकारी, माणगाव नगरपंचायत**

# ...तेव्हा वनडे होईल थरारक अन् रंजक

## मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने सुचवला नवा फॉरमॅट





**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात या वर्षी आयसीसी वनडे वर्ल्डकप होणार आहे. कसोटी आणि टी-२०च्या मध्ये असलेल्या वनडे क्रिकेटला कसे वाचवायचे यावर दीर्घ काळापासून चर्चा सुरू आहे. वनडे क्रिकेटला कोणत्या प्रकारच्या बदलाची गरज आहे यावर आता भारताचा दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने थेट आणि स्पष्ट मत व्यक्त केले आहे. वनडे क्रिकेटला वाचवण्यासाठी सचिनने एक भन्नाट आयडिया सुचवली आहे.

एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना सचिनने वनडे क्रिकेटच्या भविष्यावर मोठे वक्तव्य केले. टी-२०च्या काळात जर क्रिकेट वनडे क्रिकेट वाचवायचे असेल तर सचिनने या फॉरमॅटमला २५-२५च्या चार भागांत करण्याचा सल्ला दिला आहे. याचा अर्थ एक छोटी कसोटी मॅच होईल, जेथे प्रत्येक संघाकडे २० ऐवजी १० विकेट असतील.

सध्या वनडेत दोन डाव असतात आणि ५० ओव्हरच्या दोन डावांत दोन्ही संघाकडे प्रत्येकी १० विकेट असतात. हा फॉर्मेट दीर्घ काळापासून सुरू आहे. टी-२० क्रिकेट आले आणि प्रत्येक देशात तो लोकप्रिय झाला. यामुळे वनडे क्रिकेट संथ वाटू लागले. यामुळेच यात बदलाची गरज आहे. सचिनने ५० षटकांना दोन भागांत विभागण्याची सूचना केली आहे. जो संघ प्रथम फलंदाजी करण्यास येईल तो २५ षटके फलंदाजी करेल. त्यानंतर दुसरा संघ २५ षटके फलंदाजी करले. इथे कसोटी क्रिकेटप्रमाणे लीड घेणे आणि डावात मागे राहणे असे स्वरुप असेल. हे एक प्रकारे कसोटी क्रिकेटसारखेच असेल, पण सचिनने यात एक ट्विस्ट दिला आहे.

कसोटीत संघाकडे प्रत्येक डावात १० विकेट असतात, मात्र इथे सचिनच्या मते वनडेच्या नव्या फॉर्मेटमध्ये १० विकेटच असतील. जर एखाद्या संघाने पहिल्या डावात पाच विकेट गमावल्या तर ते दुसऱ्या डावात म्हणजे २६व्या षटकात त्याच्या पुढे खेळतील. जर एखादा संघ २५ षटकांत बाद झाला तर त्यांना पुन्हा फलंदाजी मिळणार नाही. उदाहरण सांगायचे झाले तर एखाद्या संघाने पहिल्या डावात २५ षटकांत सर्वबाद २०० धावा केल्या, तर दुसऱ्या संघाला विजयासाठी ५० षटके असतील.

### कसोटीला आकर्षक बनवण्याची गरज

कसोटी क्रिकेट सामना किती दिवसात संपतो यावर चर्चा करत बसण्यापेक्षा कसोटी क्रिकेट कसे अधिक आकर्षक करता येईल याकडे लक्ष देण्याची वेळ आली असल्याचे मत भारताचा दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरने व्यक्त केले आहे. सचिनने एका खासगी कार्यक्रमात बोलताना क्रिकेटविषयी आपली मते स्पष्टपणे मांडली. तो म्हणाला, वेगवेगळ्या खेळपट्ट्यांशी जुळवून घेणे हे क्रिकेटपटूच्या हातात असते. कसोटी हे क्रिकेटचे हृदय आहे आणि ते आपण खेळत आहोत हे सर्वांत महत्त्वाचे आहे.

## कॅप क्लबच्या वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील नामांकित मल्टीस्पोर्ट टर्फ असलेल्या कॅप क्लबच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त १९ मार्च रोजी बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल शहरात कर्नाळा स्पोर्ट्स अकादमीमध्ये कॅप क्लबच्या मल्टीस्पोर्ट टर्फमध्ये विविध खेळांचे सामने होत असतात. यामध्ये आबालवृद्ध, महिलावर्ग सहभागी होऊन खेळाचा आनंद घेतात. अशा लोकप्रिय व तरुणांच्या पसंतीच्या कॅप क्लबच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त १९ मार्च रोजी सकाळी ७ वाजल्यापासून बॉक्स क्रिकेट स्पर्धा खेळली जाणार आहे.

या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहून शुभेच्छा देणार आहेत.

स्पर्धेस नागरिकांनी उपस्थित राहून खेळाचा आनंद घ्यावा, असे आवाहन कॅप क्लबचे अ‍ॅड. मनोहर सचदेव यांनी केले आहे.

## धर्मवीर चषक क्रिकेट स्पर्धा

**उरण : बातमीदार**

शिवसेना शाखा जसखारच्या वतीने प्रकाशझोतातील भव्य ओव्हर आर्म टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जसखार येथील श्री रत्नेश्वरी देवी मंदिर मैदानात १९ ते २१ मार्च या कालावधीत करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी खासदार श्रीरंग बारणे व श्रीकांत शिंदे, आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना प्रवक्ते नरेश मस्के, कोअर कमिटी सदस्य रूपेश पाटील, उपजिल्हाप्रमुख अतुल भगत आदी उपस्थित राहणार आहेत.

## टीम इंडिया पुन्हा जाणार आयर्लंड दौऱ्यावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ या वर्षी ऑगस्टमध्ये तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी आयर्लंडचा दौरा करणार आहे. क्रिकेट आयर्लंडने ही माहिती दिली. हे सामने १८ ते २३ ऑगस्टदरम्यान मलाहाइड येथे खेळले जातील.

क्रिकेट आयर्लंडने त्यांचे आंतरराष्ट्रीय वेळापत्रक जाहीर केले. यात हा संघ भारत आणि बांगलादेशविरुद्ध पांढऱ्या चेंडूची मालिका खेळणार आहे. आयरिश संघ बांगलादेशचा दौरा करेल आणि १८ मार्च ते ८ एप्रिल या कालावधीत सर्व फॉरमॅटमध्ये सामने खेळेल. यादरम्यान दोन्ही संघांमध्ये तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि एकमेव कसोटी सामने खेळवले जाणार आहेत.

क्रिकेट आयर्लंडने म्हटले आहे की, आयर्लंडमधील क्रिकेट चाहत्यांना जगातील नंबर वन टी-२० आंतरराष्ट्रीय भारतीय संघ पाहण्याचा आनंद घेता येईल, जेव्हा आशियातील अव्वल खेळाडू या ऑगस्टमध्ये मलाहाइडला तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी येतील. भारतीय टी-२० संघाचा नवा कर्णधार हार्दिक पांड्याने गेल्या वर्षी याच ठिकाणी दोन सामन्यांच्या मालिकेत संघाचे नेतृत्व केले होते.



**अलिबाग : माणुसकी प्रतिष्ठान, रायगड प्रीमियर लीग आणि सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अलिबाग सांस्कृतिक कला व क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनावेळी घेण्यात आलेल्या धावण्याच्या स्पर्धेतील क्षण. या स्पर्धेचे उद्घाटन आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा परिषदेतील स्वच्छतादूत जयवंत गायकवाड, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, रायगड प्रीमियर लीगचे सचिव जयंत नाईक, सुरभी स्वयंसेवी संस्थेच्या अध्यक्ष सुप्रिया जेधे उपस्थित होते.** (छाया : जितू शिगवण)

## न्यूझीलंडचा अष्टपैलू ब्रेसवेल ‘आरसीबी’ संघात

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलचा यंदाचा हंगाम सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस बाकी आहेत. त्याआधी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आपल्या संघात बदल केले आहेत. विल जॅक दुखापतीमुळे स्पर्धेच्या सुरुवातीच्या अगोदर स्पर्धेतून बाहेर पडला होता. त्यामुळे न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू मायकेल ब्रेसवेल त्याच्या जागी आला आहे. ब्रेसवेलने अलीकडेच भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत बॅट आणि चेंडूने खतरनाक कामगिरी केली होती.

इंग्लंडचा विल जॅक्स नुकताच बांगलादेश दौऱ्यावर जखमी झाला. आरसीबीने लिलावात ३.२ कोटी रुपये खर्च करून त्याला आपल्या संघात समाविष्ट केले होते. जॅक्सच्या बाहेर पडल्यानंतर आता आरसीबीने मायकेल ब्रेसवेलला एक कोटीच्या मूळ किमतीत आपल्या संघात घेतले आहे. ब्रेसवेलने भारत दौऱ्यात १४० धावांची धडाकेबाज खेळी करून सर्व फ्रँचायझींचे लक्ष वेधून घेतले होते.

ब्रेसवेलने आतापर्यंत ११७ टी-२० सामने खेळले असून १३३.४८च्या प्रभावी स्ट्राइक रेटने २२८४ धावा केल्या आहेत, ज्यात एक शतक आणि १३ अर्धशतकांचा समावेश आहे. ब्रेसवेलने या कालावधीत ४० विकेट्सही घेतल्या आहेत.

